रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८८ ▌अंक १४ ▌पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)    www.krushival.in

## सरकारविरोधात ‘चिखल फेको’

**मुंबई :** राज्यातील जनता अनेक समस्यांचा सामना करत असताना महायुती सरकार त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. या सरकारने जनतेला वाऱ्यावर सोडून दिले आहे. या सरकारच्या विरोधात काँग्रेस पक्ष शुक्रवार, दि. २१ जून रोजी राज्यातील सर्व जिल्हा मुख्यालयी सकाळी ११ वाजता सरकारच्या प्रतिमेस चिखल लावून ‘चिखल फेको’ आंदोलन करून भाजपाप्रणित सरकारचा निषेध करणार आहे. राज्यातील व केंद्रातील भारतीय जनता पक्षाचे सरकार हे शेतकरी, कष्टकरी, दलित, अल्पसंख्याक, महिला, पान २ वर


# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. २० जून २०२४

किंमत ४ ₹


## बारामतीचा ‘दादा’ बदलणार?

**बारामती :** बारामतीच्या राजकारणात नव्या दादाची एन्ट्री निश्चित झाली आहे. अजित पवारांना टक्कर देण्यासाठी शरद पवार नव्या दादाला बारमतीच्या राजकारणात उतरवणार आहेत. शरद पवारांनी युगेंद्र पवारांच्या बारामती निवडणुकीतील एन्ट्रीचे संकेत दिलेत. ते बारामतीतील सांगवीमध्ये बोलत होते. नवीन पिढीमार्फत गावात विकास कसा होईल याचा प्रश्न सोडवण्यावर भर देण्याची जबाबदारी आमची असल्याचं पवार म्हणाले. यावेळी बोलताना त्यांनी अजित पवारांवरही टीका केली. पान २ वर

**आजचा अग्रलेख**

**बघेपणाची कीड**

### वेधक

## एनडीए सरकार अस्थिर : गांधी

**नवी दिल्ली :** नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशामध्ये एनडीएचं सरकार स्थापन झालं आहे. परंतु, यावेळी देशातील जनतेने भाजपला पूर्ण बहुमत दिलं नाही. त्यामुळे नितीश कुमार, चंद्रबाबू नायडू यांच्या मदतीने देशामध्ये एनडीएचं सरकार स्थापन झालं. केंद्र सरकारमध्ये जराही गडबड झाली तर एनडीएचं सरकार कोसळू शकतं, असा दावा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे. एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीमध्ये राहुल गांधींनी केंद्रातील नवीन सरकारबद्दल भाष्य केलं आहे. एनडीएमधील काही घटक पक्ष आमच्या संपर्कात आहेत. काही पक्षांमध्ये भाजपाविरोधात नाराजी असल्याचंही राहुल गांधींनी म्हटले आहे.

## गणेश देशमुख सहाय्यक संचालकपदी

**रायगड :** सिडकोच्या सहाय्यक संचालकपदी गणेश देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गणेश देशमुख हे पनवेल पालिकेच्या आयुक्तपदी कार्यरत होते. लोकसभा निवडणुकीच्या आधी त्यांची बदली करण्यात आल्यानंतर त्यांना कोठेही पोस्टिंग देण्यात आली नव्हती. अखेर त्यांची सिडकोच्या सहाय्यक संचालकपदी नियुक्ती करण्यात आली. १९ जून रोजी त्यांनी बेलापूर येथील सिडको कार्यालयात पदभार स्वीकारला. देशमुख यांची बदली केल्यानंतर पनवेल पालिकेचे आयुक्तपददेखील अनेक दिवस रिक्त होते. पनवेल महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रसाळ यांच्याकडे तात्पुरता कार्यभार देण्यात आला होता.

# महाराष्ट्राची वाताहात करणाऱ्यांना संपवा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

**ईडी आणि सीबीआयच्या चिखलात रुतलेली माणसे अंधारात साफ करण्याची कामे भाजप करीत आहेत. आपल्याला महाराष्ट्र वाचवायचा आहे. महाराष्ट्राची वाताहात करणाऱ्या व्यवस्थेला संपवण्याचा अधिकार पदवीधरांना आहे. त्या अधिकाराचा त्यांनी या निवडणुकीत परिपूर्ण वापर करावा, असे आवाहन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले. पनवेल येथील प्रचार सभेत त्यांनी भाजपा आणि मित्र पक्षांवर घणाघाती प्रहार केला. महाराष्ट्रात शेतकऱ्यांवर, तरुणांवर अत्याचार करणारे हे सरकार मुळात छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांना ठेस पोहोचविणारे सरकार आहे, या सरकारच्या उमेदवारांना छत्रपतींचे मावळे बनून गाडून टाका, असेही पटोले यांनी सांगितले.**

### नाना पटोलेंचे पदवीधरांना आवाहन; भाजपावर जोरदार प्रहार



कोकण पदवीधर मतदारसंघाचे कोकण विभाग मतदारसंघाचे उमेदवार रमेश किर यांच्या प्रचारार्थ पनवेलमधील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पदवीधरांचा मेळावा पार पडला. यावेळी नाना पटोले बोलत होते. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील, माजी आ. बाळाराम पाटील, शिवसेना उबाठा गटाचे उपनेते विजय कदम, किशोर जैन, आमदार हुस्नबानो खलिफे, आमदार नसीम शेख, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख बबन पाटील, पान २ वर

> तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न मार्गी लावून, आयएस, आयपीएस अधिकारी घडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार.
>
> – रमेश कीर, उमेदवार


> भाजपने तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न जैसे थे ठेवला आहे. हा प्रश्न महाविकास आघाडीचे उमेदवार रमेश कीर सोडवतील.
>
> – विजय कदम, शिवसेना नेते

## आघाडीचे वर्चस्व दाखवून द्या : आ. जयंत पाटील

कोकण पदवीधर मतदारसंघात महाविकास आघाडीचे वर्चस्व दाखवून द्या, असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी कार्यकर्त्यांना केले. ते म्हणाले की, रमेश कीर यांच्यासाठी मतदारांची नोंदणी केलेली मते ही २६ तारखेला कोणत्याही परिस्थितीत मतदान केंद्रापर्यंत नेण्याची जबाबदारी आपली आहे. आज वातावरण आपल्या बाजूने आहे. देशात इंडिया आघाडी, तर राज्यात महाविकास आघाडी भक्कम आहे. त्यामुळे येत्या पदवीधर मतदारसंघात महाविकास आघाडीचे वर्चस्व दाखवून द्यायचं आहे. रमेश कीर यांनी शिक्षकांचे, पदवीधर तरुणांचे प्रश्न मार्गी लावण्यावर भर द्यावा. कारण, इतर प्रश्न मार्गी लावण्याचे काम आम्ही करीत आहोत. आज एकच सांगतो, मला देशाचे पंतप्रधान म्हणून राहुल गांधींना बघायचे आहे. जी लोकं पाच वर्षांपूर्वी राहुल गांधी यांना नावं ठेवत होती, त्याच राहुल गांधींनी या कर्तृत्व सिद्ध करुन दाखवलं सगळ्यांना आपलं आहे. त्यामुळे जे वारे आपल्या बाजूने वाहत आहेत, ते टिकवून त्या वाऱ्याचे वादळात रूपांतर करण्यासाठी आपण प्रयत्न करूया, असे आवाहनदेखील जयंत पाटील यांनी पदाधिकाऱ्यांना केले.



## बसला ट्रेलरची धडक; एक ठार



**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्ग क्रमांक ६६ वर पोलादपूर ग्रामीण रुग्णालय परिसरातील अपघातप्रवण क्षेत्र सक्रिय झाल्याचे पुन्हा एकदा दिसून आले आहे. उभ्या लक्झरी बसवर भरधाव ट्रेलरची धडक बसून झालेल्या अपघातात एक उतरलेला प्रवासी जागीच ठार झाला, तर अकरा प्रवासी जखमी झाल्याची घटना बुधवारी पहाटे सव्वाचार वाजण्याच्या सुमारास घडली आहे. यावेळी एका स्कुटरलाही धडक बसल्याने हा तिहेरी अपघात ठरला आहे. याच ठिकाणी गेल्या महिन्यात उभ्या कंटेनरला भरधाव कारने धडक दिल्याने दोन जण ठार झाले होते. यामुळे हे अपघातप्रवण सक्रिय झाल्याच्या दाव्याला दुजोरा मिळाला आहे.

बुधवारी सकाळी सव्वाचार वाजण्याच्या सुमारास घाटकोपर ते कामथे जाणारी कदम ट्रॅव्हल्स लक्झरी बस ही पोलादपूर ग्रामीण रुग्णालयासमोर आली असता प्रवासी उतरण्यासाठी पान २ वर

**रवींद्र यशवंत सकपाळ हे बसच्या डिकीमधून सामान उतरवित असताना भरधाव ट्रेलर बसवर आढळल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला, तर चालक शुभम दीपक दरेकर (२६), चालक विश्वनाथ विठ्ठल उतेकर (३२), संतोष गेनू केसरकर (४८), महादेव सखाराम गोगावले (५५), ओंकार चंद्रकांत सकपाळ (२४), नारायण श्रीपत सणस (७२), सूरज सखाराम जाभडे (३०), निखिल रवींद्र सकपाळ (३०), विष्णू तुकाराम सणस (६०), जनाबाई सुरेश सलिमकर (४३), चंद्रकांत तुकाराम गोगावले (५९) हे जखमी.**

# सुरईवर दरडीची टांगती तलवार




**प्रमोद जाधव**

**। अलिबाग ।**

सुरई येथील दत्त टेकडीच्या परिसरात वेगवेगळ्या धनदांडग्यांनी बांधकाम करण्यास सुरुवात केली आहे. मात्र, काही धनदांडग्यांकडून डोंगराच्या कडेला होत असलेला दगड मातीचा भराव जीवघेणा ठरत आहे. डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या शेकडो घरांसह आणि हजारो नागरिकांवर मानवनिर्मीत दरडीच्या टांगत्या तलवारीचे संकट ओढावण्याची भीती निर्माण होत आहे.

> सुरई येथील दत्त टेकडीच्या परिसरात डोंगराच्या किनाऱ्यावर असलेल्या दगड मातीच्या भरावाची पाहणी केली जाणार आहे. या माती, दगडातून दरड कोसळण्याची भीती असल्यास त्यावर योग्य ती उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला जाईल.
>
> – रोहन शिंदे, तहसीलदार, मुरुड

रायगड जिल्ह्यामध्ये दरडग्रस्त गावे, वाड्यांची संख्या १८१ असून, दरड कोसळून दुर्घटना होण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहे. दरडीत सापडून अनेकांना जीव गमवावा लागला आहे. पान २ वर

## अवैध गावठी दारु विक्री जोरात

### दारू विक्रेत्यांना आशीर्वाद कुणाचा?

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यामध्ये पेण, दादर सागरी आणि वडखळ हे तीन पोलीस ठाणी येत असून, दादर सागरी आणि वडखळ पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गावठी दारूची विक्री होत आहे. वेळोवेळी ग्रामस्थांनी तक्रार करूनदेखील गावठी दारू विक्रेत्यांना लगाम घालण्यात पोलीस यंत्रणा कमी पडत आहेत, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. आज सर्रास ग्रामीण भागात गावठी दारूची विक्री होत असल्याने ही अवैध दारू विक्री कुणाच्या आशीर्वादाने होत आहे, असा सवाल सर्वसामान्य जनता करत आहे.

वडखळ पोलीस ठाण्याच्या भौगोलिक हद्दीचा विचार केल्यास इतर दोन पोलीस ठाण्यांपेक्षा विस्तीर्ण आहे. वाशी खारेपाट पूर्ण, शिर्की खारेपाट पूर्ण, पाबळ खोरे आणि आमटेम-कोलेटी यामध्ये मोठ्या प्रमाणात समुद्र किनारा आणि डोंगराळ भागाचा समावेश आहे. या विस्तीर्ण क्षेत्रात दुर्गम भाग असल्याने या भागात हातभट्टीचे व्यवसाय चालतात. हातभट्टी व्यवसायावर पोलीस खात्यापेक्षा कर व शुल्क विभागाचा वचक असणे गरजेचे आहे; परंतु असे होत नाही. पोलीस यंत्रण कमी पडत असल्याने गावनिहाय पोलिसांना मदत करण्याचे काम पोलीस पाटील करत असतात. वडखळ पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात ३६ पोलीस पाटील आहेत. याचाच अर्थ, जवळपास प्रत्येक गावात पोलीस पाटील आहेत. त्यांनी पान २ वर

### नवी मुंबईतील पोलीस भरती दोन दिवस पुढे ढकलली

## पावसाने फिरवले चाचण्यांवर पाणी

**। पनवेल । वार्ताहर ।**

मैदानावर पावसाच्या सरी कोसळल्याने पोलीस भरतीच्या मैदानी चाचणीसाठी मैदान सुस्थितीत नसल्याने नवी मुंबई पोलीस आयुक्तांनी पोलीस भरती प्रक्रिया दोन दिवस पुढे ढकलण्यात आल्याचे बुधवारी सकाळी जाहीर केले. १८५ पोलीस कर्मचारी या पदांसाठी तब्बल ७ हजार उमेदवारांनी अर्ज केले आहेत. १९ ते २६ जूनपर्यंत ही भरती प्रक्रिया होणार असून, बुधवारी पहिल्याच दिवशी पावसामुळे मैदान सुस्थितीत नसल्याने नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी मैदानाची पाहणी केल्यानंतर पुढील दोन दिवस भरती प्रक्रिया पुढे ढकल्याचे जाहीर केले.

नवी मुंबईची पोलीस भरती प्रक्रियेतील १९ व २० जून रोजी होणाऱ्या उमेदवारांची मैदानी चाचणी २३ जूनला सुरु होईल. २१ व २२ जूनच्या उमेदवारांची मैदानी चाचणी २७ जूनला करण्याचे नियोजन नवी मुंबई पोलीस दलाने आखले आहे. याबाबतची माहिती पोलीस भरतीसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांना संकेतस्थळावरुन तसेच उमेदवारांच्या मोबाईल फोनवर पोलीस विभागाकडून कळविण्यात येणार आहे. नवी मुंबईतील पोलीस भरती प्रक्रियेसाठी कळंबोली येथील रोडपालीजवळील पोलीस मुख्यालयाच्या मैदानात बुधवारी पहाटे पाच वाजल्यापासून कडेकोट पोलीस बंदोबस्त पोलीस आयुक्तांनी लावला होता.



## दहशतवादी ठार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

काश्मीर खोऱ्यातील बारामुल्ला येथे सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये बुधवारी झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी दोन दहशतवाद्यांचा खात्मा केला असून, एक एसओजी (जम्मू-काश्मीर पोलीस) जवान जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भारतीय लष्कर, सीआरपीएफ आणि जम्मू-काश्मीर पोलिसांच्या संयुक्त पथकाकडून ही कारवाई करण्यात आली. जिल्ह्यातील सोपोरमधील हदीपोरा भागात दहशतवादी लपल्याची गुप्त माहिती मिळाली होती. यानंतर लष्कर, सीआरपीएफ आणि पोलिसांच्या संयुक्त पथकाने शोधमोहीम सुरू केली. यावेळी अचानक दहशतवाद्यांनी गोळीबार सुरू केला.

## रायगडावर आज तिथीनुसार शिवराज्याभिषेक

- **ध्वजपूजन, पालखी, शोभायात्रांनी रंगणार सोहळा**
- **मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची उपस्थिती**

**। रायगड । प्रतिनिधी ।**

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीला म्हणजेच गुरुवारी (दि.२०) किल्ले रायगड छत्रपती शिवरायांचा तिथीनुसार शिवराज्याभिषेक दिन सोहळा साजरा केला जाणार आहे. या सोहळ्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत. ६ जूनला तारखेप्रमाणे साजऱ्या होणाऱ्या शिवराज्याभिषेक दिनासारखीच जय्यत तयारी प्रशासनाकडून करण्यात आली आहे. दुर्गराज सेवा समिती व कोकणकडा मित्र मंडळाच्या वतीने पान २ वर



### पार्किंग व्यवस्था

**शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज असून, महाडकडून रायगडकडे येणाऱ्या शिवप्रेमींच्या वाहनांकरिता कोंझर, वाडा, वाळसुरे, अक्षय कन्स्ट्रक्शनच्या मोकळ्या भूखंडावर पार्किंगची व्यवस्था केली आहे.**

### १७ वा हप्ता खरिपासाठी ठरणार मदतगार

# लाखभर शेतकऱ्यांच्या खात्यात 22 कोटी

**16** वा हप्ता

आतापर्यंत **12,33,00,000/-** अधिकांना लाभ

**3** लाख कोटींहून अधिक रकमेचे डीबीटीतून वितरण



**20,000** कोटी रुपये वितरित

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १० जून रोजी किसान निधीचा १७ वा हप्ता जारी करण्यासाठी त्यांच्या पहिल्या फाईलवर स्वाक्षरी केली होती. ज्यामध्ये ९.३ कोटी शेतकऱ्यांना १७ वा हप्ता देण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले. सुमारे २०,००० कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.**

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

तिसऱ्यांदा शपथ घेतल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी काशीमधून प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजनेचा १७ वा हप्ता जाहीर केला. रायगड जिल्ह्यातील सुमारे एक लाख १० हजार ९४ शेतकऱ्यांना त्याचा लाभ झाला आहे. त्यांच्या बँक खात्यात २२ कोटी एक लाख ८८ हजार रुपयांची रक्कम जमा झाली आहे.

सध्या खरिपाचा हंगाम सुरु आहे. सर्वत्र शेतकऱ्यांची शेतीच्या कामांसाठी लगबग सुरु आहे. शेतकऱ्यांना खरीप हंगामात बियाणे, खते, औषधांसारख्या कृषी संलग्नबाबीची आवश्यकता आहे. १७ हप्ता हा याच कामासाठी शेतकऱ्यांना मदतगार ठरणार आहे. यावेळी पंतप्रधान मोदी किसान संवाद कार्यक्रमांतर्गत २१ शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. पान २ वर

### १६ वा हप्ता २८ फेब्रुवारीला वितरीत

**मोदी ३.० सरकारच्या पहिल्या निर्णयानुसार किसान सन्मान निधीचा १७ वा हप्ता १८ जून २०२४ रोजी दिला. आत्तापर्यंत केंद्र सरकारने पीएम किसानचे १६ हप्ते लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यावर पाठवले आहेत. पीएम किसान योजनेचा १६ वा हप्ता (पीएम किसान १६ वा हप्ता) २८ फेब्रुवारी २०२४ रोजी हस्तांतरित करण्यात आला होता.**

## प्रशासन घेणार शाळाबाह्य मुलांचा शोध

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

जिल्ह्यातील ३ ते १८ वयोगटातील शाळाबाह्य, अनियमित आणि स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण विभागाकडून शाळाबाह्य मुलांची विशेष शोधमोहीम ५ जुलैपासून हाती घेण्यात येणार आहे. ही मोहीम २० जुलैपर्यंत राबविली जाणार आहे. या मोहिमेंतर्गत शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड आणि प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांनी दिली.

रायगड जिल्ह्यात प्राथमिक समग्र शिक्षा कार्यक्रमाची तसेच प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत ज्ञानरचनावादी शाळा, कृतीयुक्त अध्ययन पद्धती, डिजिटल शाळा, आयएसओ मानांकन, मोफत पाठ्यपुस्तक, मोफत गणवेश, मध्यान्ह भोजन, विविध शिष्यवृत्ती, शिष्यवृत्ती परीक्षा तयारी, नवोदय परीक्षा तयारी अशा प्रभावी उपक्रमांची अंमलबजावणी अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकांमार्फत पान २ वर

### ५ जुलैपासून मोहिमेला होणार सुरुवात



**गेल्या तीन वर्षांतील शाळाबाह्य मुले**

| वर्ष | मुले |
|---|---|
| २०२१-२२ | २८५ |
| २०२२-२३ | १५० |
| २०२३ -२४ | १७४ |

# वरंध घाटात दरडीचा धोका

। महाड । वार्ताहर ।

महाड-भोर-पुणे या मार्गावर जागोजागी दरडीचा धोका कायम आहे. या मार्गावर वाघजाईजवळ दरी असलेल्या भागावरील एक भाग कोसळला आहे. वरंध घाटात जागोजागी दरडी आणि भूस्खलनाचा धोका निर्माण झाला आहे. याठिकाणी छोटे-छोटे दगड रस्त्यावर आले आहेत. बुधवारी (दि. १९) सकाळी वाघजाई मंदिराजवळ रस्त्याचा एक भाग खचला गेला आहे. हा भाग भोर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येत आहे.

रायगड आणि पुणे जिल्ह्याला जोडला जाणारा महाड-भोर-पुणे हा मार्ग गेली काही वर्षे भूस्खलन आणि दरडींमुळे सातत्याने बंद पडत आहेत. बुधवारी सकाळी वाघजाई मंदिराजवळ दरीच्या दिशेने असलेली संरक्षक भिंतीचा काही भाग खचला गेला आहे. पावसाळा सुरू झाला असला तरी मुसळधार पाऊस नसल्याने या घाटातून पर्यटक



तुरळक प्रमाणात आहेत. या मार्गावर सार्वजनिक बांधकाम विभाग दरवर्षी करोडो रुपये खर्च केला आहे. मात्र, तरीदेखील हा घाट मार्ग वाहतुकीस धोकादायकच ठरत आहे. संरक्षक कठडे, पाण्याचा निचरा होण्यासाठी केली जाणारी गटर व्यवस्था आणि इतर आवश्यक बाबी दरवर्षी करणे सार्वजनिक बांधकाम विभागाचे नित्याचे काम आहे. याकरिता केलेल्या तरतुदीनुसार खर्च केला जातो. हा मार्ग सध्या महामार्ग बांधकाम विभागाच्या ताब्यात आहे. महामार्ग बांधकाम विभागाकडून रस्त्याचे रुंदीकरण केले जात आहे. अद्याप हे काम अत्यंत संथ गतीने सुरु असले तरी घाटातील बहुतांश भागात खोदकाम केले जात आहे.

गेल्या दोन वर्षांपासून वरंध घाटात ज्या ठिकाणी दरडी आणि भूस्खलन झाले होते, त्याठिकाणी सिमेंट काँक्रिटच्या भिंती उभ्या केल्या आहेत. आतापर्यंत जवळपास ६ कोटी रुपये खर्च करून भिंती उभ्या केल्या. ज्या ठिकाणी भिंती उभ्या केल्या आहेत, त्या शेजारील भागदेखील मातीचा असल्याने या

## प्रवासासाठी वरंध घाट धोकादायक

**पावसाळ्यापूर्वी नागरिकांचा प्रवास सुखकर होण्यासाठी देखभाल दुरुस्ती करणे आवश्यक होते. मात्र, कंपनीने याकडे दुर्लक्ष केले आहे. यामुळे वरंधा घाटात प्रवास करणे धोकादायक बनला आहे. वरंधा घाटात पावसाळी पर्यटन वाढले आहे. येथील धबधबे आणि निसर्ग सौंदर्य सर्वांनाच आकर्षित करते. यामुळे तरुणाई मोठ्या प्रमाणात या घाटातून दुचाकीवरून प्रवास करते. यामुळे घाटात काम करणाऱ्या कंपनीकडून सुरक्षा बाळगणे गरजेचे आहे.**

पावसात अनेक ठिकाणी माती खाली येत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे दरडीचा धोका हा कायम असल्याने करोडोच्या भिंती किती ठिकाणी उभ्या करणार, असा प्रश्न यामुळे निर्माण झाला आहे.

# कार्लेखिंडीत केमिकल टँकर पलटी

■ क्रेन उपलब्ध न झाल्याने अपघातग्रस्त टँकर काढण्यात अपयश

## एकजण जखमी

। सोगाव । वार्ताहर ।

बुधवार, दि.१९ जूनच्या मध्यरात्रीच्या सुमारास अलिबाग-पेण मार्गावर कार्लेखिंडीतील अवघड वळणावर आरसीएफ थळ कारखान्यातून तुर्भे-मुंबईकडे जाणारा रसायनाची वाहतूक करणारा टँकर एका कार चालकाने हुल दिल्यामुळे कारला वाचविण्याच्या प्रयत्नात रस्त्याच्या कडेला पलटी होऊन अपघात झाला आहे.

दरम्यान अपघात झाल्यानंतर टँकरचालक पळून गेला, तर क्लिनर किरकोळ जखमी झाला आहे. अपघातानंतर अपघातग्रस्त टँकरमधून वायुगळती सुरू झाली होती. या अपघाताची माहिती मिळाल्यानंतर अलिबाग पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. टँकरमधील रसायनाच्या सुरक्षेच्या दृष्टीने आरसीएफ येथील अग्निशमन दलाला



व आरसीएफ प्रशासकीय अधिकाऱ्यांना पाचारण केले. या मार्गावरील वाहतूक सुरळीत होण्यासाठी व कोणत्याही प्रकारचा त्रास प्रवाशांना व वाहनचालकांना होऊ नये यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. मात्र, वायुगळतीमुळे कोणताही धोका नसल्याचे आरसीएफ प्रशासकीय अधिकारी यांनी यावेळी सांगितल्याने वाहतूक सुरळीत चालू ठेवली. तरीही अपघातग्रस्त टँकर काढताना काही काळ सुरक्षेच्या दृष्टीने वाहतूक बंद ठेवण्यासाठी वाहतूक पोलिसांनी नियोजन केले होते.

सदर अपघातग्रस्त टँकर संध्याकाळी ६ वाजेपर्यंत क्रेन उपलब्ध न झाल्याने काढण्यात आले नव्हते. याबाबत अलिबाग पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, अधिक तपास अलिबाग पोलीस करत आहेत.

# गोवंश हत्याप्रकरणी २० जणांना अटक

■ शनिवारी महाडमध्ये निषेध मोर्चा

। रायगड । खास प्रतिनिधी ।

महाड तालुक्यातील ईसाने कांबळे येथे मंगळवारी १८ जून रोजी गोवंश हत्येची घटना घडली होती. गोवंश हत्येतील आरोपींसह त्यांच्या समर्थकांनी गोरक्षकांना बेदम मारहाण केली, तसेच पोलींसाना धक्काबुक्की केल्याची घटना घडली होती. पोलिसांनी आता याप्रकरणी सुमारे २० जणांविरोधात कारवाई केली आहे.

सदरची घटना घडल्यानंतर आरोपींनी केलेल्या मारहाणीत एक गोरक्षक जखमी झाला होता. सुरुवातीला पोलिसांनी सहा जणांवर गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर पोलिसांना धक्काबुक्की करणे आणि गोरक्षकांना मारहाण केल्याप्रकरणी पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. त्यांनी अन्य २० जणांवर गुन्हा दाखल केला आहे. सध्या परिसरात तणावपूर्ण शांतता आहे. घटनेचा अधिक तपास महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने हे करीत असून, नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे.

**गोवंश हत्या व गोरक्षकांना झालेल्या मारहाणीच्या घटनेच्या निषेधार्थ रायगड जिल्ह्यातील सकल हिंदू समाजातर्फे शनिवारी २२ जून रोजी सकाळी ११ वाजता महाड शहरातील ऐतिहासिक चवदार तळे ते प्रांताधिकारी कार्यालय असा निषेध मोर्चाचे काढण्यात येणार आहे.**

# गोमांसाची वाहतूक करणारे गजाआड

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

गोवंश जातीच्या कत्तल करून गोमांस वाहतूक करणाऱ्यांना पाली पोलिसांनी मंगळवारी (दि. १८) उन्हेरे फाटा येथे पकडले. बुधवारी (दि. १९) पाली पोलीस ठाण्यात यासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी सातपैकी सहा जणांना ताब्यात घेतले असून, एक जण फरार आहे.

या आरोपींना पकडण्यात गोरक्षकांनी पोलिसांना सहाय्य केले. या गुन्ह्यात गाडीचा चालक उदय हरी राणे (४५), रा. खांब, ता. रोहा, मैनुनद्दीन आदम कुरेशी (३७) रा. वाकण कुरेशी नगर पाटणसई रोहा, हसन आदम कुरेशी ;३२ राहणार वाकण कुरेशी नगर पाटणसई ता. रोहा, मुजफ्फर इकबाल पानसरे (३३) मीरानगर नागोठणे, ता. रोहा, आफताब अख्तर (३३) मीरानगर नागोठणे, ता. रोहा, मजहर युनूस खान (३५) आझाद नगर रोहा,



दानिश राहणार अधिकारी मोहल्ला नागोठणे तालुका रोहा यांचा समावेश आहे. दानिश हा फरार झाला आहे. या प्रकरणाची फिर्याद पोलीस ऋषिकेश कृष्णा थळे यांनी पाली पोलीस ठाण्यात दिली.

यावेळी पोलिसांनी पाच लाख रुपयांची एक सफेद रंगाची एर्टिगा कार, ६०० रुपयांचा एक स्टीलचा डबा ज्यामध्ये एकूण पाच पिशव्या असून, त्यांचे वजन ४.८०० ग्रॅम भरले. तसेच डब्यासह पिशवीतील मांसाचे वजन पाच किलो ९०० ग्रॅम भरले, पाचशे रुपये किमतीचा एक सफेद रंगाचा आईस बॉक्समध्ये पाच काळ्या रंगाच्या पिशवीमध्ये मांस असून, त्याचे वजन चार किलो ४०० ग्राम भरले. आईस बॉक्स पिशवीतील मांसाचे वजन चार किलो ८२० ग्रॅम भरले. असा एकूण पाच लाख एक हजार १०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक संतोष जाधव अतिरिक्त कार्यभार पाली पोलिस ठाणे व सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरक्षनाथ बालवडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार श्री. भोईर हे करत आहेत.

# शाळांमधूनच शैक्षणिक साहित्याची विक्री

। महाड । वार्ताहर ।

नवीन शैक्षणिक वर्ष सुरु झाले असल्याने शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी बाजारात पालकांची लगबग सुरु झाली आहे. प्रतिवर्षी शैक्षणिक साहित्याच्या किमतीत होणारी वाढ यावर्षीदेखील थांबली नाही. नियमित वापरातील वह्यांच्या किमतीमध्ये कमालीची वाढ झाली आहे. तर अन्य शैक्षणिक साहित्य, गणवेश, विद्यार्थी वाहन फी, प्रवेश फी यामधील वाढ पालकवर्गात चिंता निर्माण करणारी आहे.

महाड बाजारपेठेत सध्या शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी लगबग सुरु झाली आहे. गेली कांही वर्षापासून काही शाळा शैक्षणिक साहित्य शाळेतूनच घेण्याचा आग्रह करत असले तरी विविध वह्या, पुस्तके, गाईड्स, आणि पावसाळी चप्पल, दफ्तर, घेण्यासाठी बाजारपेठेत गर्दी होऊ लागली आहे. शासनाने शिक्षण संस्थाना कितीही नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला तरी आजही शाळांमधून शैक्षणिक साहित्य विक्री केली जात आहे. यामुळे बाजारपेठेत शैक्षणिक साहित्य विक्रीवर परिणाम जाणवू लागला आहे.

यावर्षी नियमित आकाराच्या वह्यांमध्ये किमान १५ ते २५ रुपयांची वाढ झाली आहे. पाल्यांच्या शिक्षणासाठी धडपड करणाऱ्या पालकांचा या वस्तू खरेदीकडे असलेला कल वाढला आहे. शाळा आणि कॉलेजकरिता लागणारे नोटबुक, लाँग बुक, कंपास, कवर रोल, यामध्येदेखील वाढ झाली आहे. यापूर्वी ४० ते ६० दरम्यान मिळणारी कंपास पेटी आता ८० ते १३० पर्यंत मिळत आहे. तर अन्य शैक्षणिक साहित्यातदेखील किमान २५ ते ३० रुपयाची दर वाढ झाली आहे.

पान १ वरून

## महाराष्ट्राची वाताहात करणाऱ्यांना संपवा

शिरीष बुटाला, आर.सी. घरत, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत, पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, कामगार नेत्या श्रुती म्हात्रे, स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे, शेकाप पनवेल तालुका चिटणीस राजेश केणी, समाजवादी पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष अनिल नाईक, मल्लिनाथ गायकवाड, अवचित राऊत यांच्यासह पनवेल तसेच महाविकास आघाडीचे सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना नाना पटोले यांनी सांगितले की, ही निवडणूक ही रमेश किर यांची नाही तर सर्व पदवीधर तरुणांची निवडणूक आहे. कोरोनानंतर महाराष्ट्रात जे असंविधनिक सरकार आलं, तेव्हापासून राज्याचं वाटोळं झालं. आज महाराष्ट्रात पोलिसांच्या १७ हजार पदाच्या भरतीसाठी १७ लाख उमेदवारांनी अर्ज भरले आहेत. असे असले तरी भाजपच्या माध्यमातून होणाऱ्या या भरतीमध्ये कधीही त्रुटी निर्माण करून भरती प्रक्रिया रद्ददेखील करण्याचे काम भाजपच्या माध्यमातून केलं जाऊ शकते. पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुका नागपूर, अमरावती याठिकाणी झाल्या. मात्र, नागपूर म्हणजे भाजप हे समीकरण असतानादेखील पदवीधर तरुणांनी मात्र यावेळी भाजपला धुवून टाकले. याठिकाणी सुशिक्षित मतदारांनी महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा विजय केला.

यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना माजी आमदार तथा शिवसेना उपनेते विजय कदम यांनी सांगितले की, नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राने महाविकास आघाडीच्या माध्यमातून दिल्लीलादेखील दाखवून दिले आहे की, महाराष्ट्रात महाविकास आघाडीची धोरणे जनतेला कशी पटली आहेत. आता होऊ घातलेल्या पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत कोकण मतदारसंघात महाविकास आघाडीची ताकद दाखवून द्यायचीच आहे. कारण शिवसेनेने गेल्या वर्षीच ७५ हजार पदवीधर मतदारांची नोंदणी केली आहे. आज संपूर्ण कोकण मतदारसंघात राष्ट्रवादी, काँग्रेस, शेतकरी कामगार पक्ष आणि मित्र पक्षाचे एकूण मतदार नोंदणी ही जवळपास अडीच ते तीन लाखांच्या घरात असल्यामुळे रमेश कीर यांच्या विजयासाठी आपण नोंदणी केलेले मतदार हे मतदानापर्यंत पोहोचविणे, नंतर त्यांना घरापर्यंत सोडण्याची जबाबदारी ही कार्यकर्त्यांची आहे. महाराष्ट्राचं दुर्दैव म्हणून भाजपने तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न जैसे थे ठेवला आहे. हे अपयश नेमकं कोणाचं हाच प्रश्न उपस्थित होतोय. तसेच महाराष्ट्रातील तरुणांना आयपीएस, आयएएस अधिकारी हे कसे लवकर होता येईल यासाठी रमेश कीर हे प्रयत्न करतील, असा विश्वास देखील विजय कदम यांनी व्यक्त केला.

## सुरईवर दरडीची टांगती तलवार

आतापर्यंत सुमारे ३२५ हून अधिक जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. आजपर्यंत पावसाळ्यात नैसर्गिक दरडीचा धोका निर्माण झाल्याने जीवित व वित्तहानी झाली आहे. मात्र, जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील सुरई येथे मानवनिर्मीत दरडीचा धोका निर्माण होण्याची भीती निर्माण झाली आहे.

निसर्गाच्या सान्निध्यात असलेल्या या डोंगरावर धनदांडग्यांनी जमीन विकत घेऊन बांधकाम केले आहे. त्यासाठी अवैधरित्या डोंगर पोखरण्यात आले आहेत. दरम्यान, डोंगरातील दगड मातीचा भराव डोंगराच्या टोकावर टाकण्यात आला आहे. पावसाळ्यात दगड, माती खाली येऊन जीवितहानी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. डोंगराच्या टोकापासून शंभर फूट खाली आदिवासीवाड्यांसह गावे आहेत. या ठिकाणी अडीचशेहून अधिक घरे असून, एक हजारहून नागरिक राहात आहेत. त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

विकासाच्या नावाखाली धनदांडग्यांकडून होणाऱ्या दरडीचा धोका रोखण्यास जिल्हाधिकारी लक्ष देतील का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## रायगडावर आज तिथीनुसार शिवराज्याभिषेक

किल्ल्यावर दरवर्षी तिथीनुसार शिवराज्याभिषेक दिन सोहळा साजरा केला जातो. यावर्षी कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष आमदार भरत गोगावले असून, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व देवेंद्र फडणवीस यांच्यासह रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यावेळी उपस्थित राहणार आहेत. रायगड किल्ल्यावर गुरुवारी सकाळी साडेसहा वाजता ध्वजपूजन केले जाणार आहे. सात वाजता शिवरायांच्या पालखीचे प्रस्थान होईल. आठ वाजता नगारखान्यासमोर ध्वजारोहण व नऊ वाजता मुख्य शिवराज्याभिषेक सोहळा पार पडेल. दहा वाजता शाही शोभायात्रा काढली जाणारा असून, अकरा वाजता महाप्रसाद आणि त्यानंतर गड स्वच्छता मोहीम राबवण्यात आली आहे.

## बसला ट्रेलरची धडक; एक ठार

महामार्गावर साईडवर बस उभी करण्यात आली होती. यावेळी महाड दिशेकडून पाठीमागून भरधाव येणारा ट्रेलरने (क्र. आर जे ०९ जी डी ४५७६) लक्झरी बसला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात एक जण ठार, तर ११ जण जखमी झाले आहेत. ही धडक एवढी जोरदार होती की, लक्झरी बसचालकाच्या डोक्याला मार लागून तो जागीच बेशुद्ध झाल्याने बस सुमारे २०० ते २५० फूट महामार्गावर पुढे गेली. मात्र, प्रसंगावधान राखून सोबतच्या दुसऱ्या चालकाने हॅन्ड ब्रेक ओढून बस थांबविण्यासाठी कसोशीने प्रयत्न केला. यामुळे संभाव्य मोठा अपघात टळला असल्याचे प्रवाशांनी सांगितले. या बस मधून ३० प्रवासी चालक, सहचालक व क्लीनर असे एकूण ३३ जण प्रवास करीत होते.

दरम्यान, लक्झरी बससमोर उभी असलेल्या ॲक्टिवा स्कुटरवरील (एम एच ०२ जी सी २४१५) चालक लघुशंकेसाठी थांबला असताना त्यालाही ठोकर लागून जखमी झाला असल्याने हा तिहेरी अपघात झाल्याचे दिसून आले आहे. जखमींपैकी सहा जणांना गंभीर दुखापत झाल्याने अधिक उपचारासाठी महाड येथे हलविण्यात आले आहे.

## ... दारु विक्री जोरात

गावात चाललेल्या अवैध धंद्यांची माहिती देणे गरजेचे आहे. परंतु, पोलीस पाटील आपल्या कामात कामचुकारपणा करत असल्याने गावठी दारू विक्री अवैधपणे सुरू आहे, असे बोलले जात आहे. दादर सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोनखार, उर्नोली, दादर ते रावेपासून खारपाडा, जिते ही गाव येतात. या पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात एकूण १६ पोलीस पाटील असणे गरजेचे आहे; परंतु ११ जागा रिक्त आहेत. फक्त पाच पोलीस पाटील कार्यरत आहेत. पेण पोलीस ठाण्याचा विचार करता या पोलीस ठाण्याच्या हद्दीत पूर्ण पूर्व विभाग येत असून, पूर्व विभाग हा दुर्गम भाग आहे. वाड्या-वस्त्यांवर पोलिसांना पोहोचणे शक्य होत नाही. या पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात ३२ पोलीस पाटील आहेत. एकंदरीत काय तर, तीन पोलीस ठाण्यांच्या हद्दीत जवळपास ८० ते ८५ पोलीस पाटील कार्यरत आहेत. मात्र, यांना आपल्या जबाबदारीची विसर पडल्याने आज गावोगाव अवैध धंद्यांना ऊत आला आहे, असा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. तीनही पोलीस ठाण्यांकडून दारू विक्री होऊ नये म्हणून पुरेपूर प्रयत्न केले जात असून, पोलीस कर्मचाऱ्यांच्या अभावी पोलीस यंत्रणा कमी पडत असल्याची चर्चा आहे.

## ...खात्यात २२ कोटी जमा

कृषी सखी म्हणून प्रशिक्षण घेतलेल्या महिलांना प्रमाणपत्रही देण्यात आले. काशी येथून डिजिटल किसान क्रेडिट कार्डही त्यांनी लॉन्च केले. शिवाय, सेंद्रिय शेती करणाऱ्या १६७ किसान सखींनाही प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १७ व्या हप्त्याचे पैसे काशीमधून योजनेच्या लाभार्थ्यांच्या खात्यात दिले आहेत. याआधी १० जून रोजी मोदींनी पीएम किसान योजनेच्या फाइलवर स्वाक्षरी केली होती. त्यांच्या तिसऱ्या कार्यकाळातील ही पहिली फाईल होती, जी त्यांनी पास केली आहे. शेतकऱ्यांना मदत करणाऱ्या या योजनेच्या १६ हप्त्यांमध्ये आतापर्यंत १२ कोटी ३३ लाखांहून अधिक लाभार्थ्यांना ३ लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम डीबीटीमधून थेट वितरित करण्यात आली होती.

## ... शाळाबाह्य मुलांचा शोध

शाळांमध्ये सुरू आहे. मात्र, शासनाच्या अनेक योजना सुरू असतानाही अद्याप काही बालके शाळाबाह्य असल्याचे निदर्शनास येत आहे. अशा बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन सदर मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याकरिता शोधमोहीम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेत घरोघरी जाऊन शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करण्याव्यतिरिक्त बसस्थानक, रेल्वेस्थानक, बाजारपेठ, वीटभट्ट्या, दगडखाणी, साखर कारखाने, स्थलांतरित कुटुंबे, जिल्ह्यातील सर्व खेडी, गाव, वाडी, तांडे, पाडे, शेतमळे, जंगल, बालगृह, निरीक्षण गृह, विशेष दत्तक संस्था आदी ठिकाणी जाऊन शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या नोंदी करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

शाळाबाह्य मुलांच्या विशेष शोध मोहिमेंतर्गत ३ ते ६ वयोगटातील जी बालके एकात्मिक बाल विकास योजनेचा लाभ घेत नाहीत तसेच खासगी बालवाडी, इंग्रजी माध्यमांचे ज्युनिअर केजी, सिनिअर केजीमध्ये जात नाहीत व ६ ते १८ वर्ष वयोगटातील शाळाबाह्य बालके यांची शोधमोहीम घेण्यात येणार आहे. सदर कालावधीत नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. भरत बास्टेवाड आणि पुनिता गुरव यांनी केले आहे.

## सरकारविरोधात 'चिखल फेको'

तरूण, गरिब व सामान्य जनतेच्या विरोधातील आहे. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने चालणाऱ्या महाराष्ट्राच्या प्रतिमेला काळिमा फासण्याचे काम या सरकारने केले आहे. या सरकारच्या विरोधात जनतेत तीव्र संताप असून, सरकारला जाब विचारण्यासाठी आंदोलन केले जाणार आहे. या आंदोलनात जिल्ह्यातील प्रमुख नेते, माजी मंत्री, खासदार, आमदार, माजी खासदार, माजी आमदार, महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, एनएसयुआय, सेवादल, इंटक, सेल व विभाग यांच्या पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होऊन भाजर सरकारचा निषेध करणार आहेत.

## बारामतीचा 'दादा' बदलणार?

लोकसभा निवडणुकीत सुनेत्रा पवारांचा पराभव केल्यानंतर शरद पवारांनी आता विधानसभेसाठी मोर्चेबांधणीला सुरूवात केली आहे. बारामती मतदारसंघात अजित पवार यांना घेरण्याची रणनीती शरद पवारांनी आतापासूनच आखण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे बारामतीमध्ये काका अजित पवार विरुद्ध पुतणे युगेंद्र पवार असा थेट सामना होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालकांकडून खरेदी घेणेचे निश्चित करून साठेकरार केला आहे. सदर मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

तुकडी व जिल्हा रायगड, पोटतुकडी व तालुका अलिबाग मौजे कामथ, ता. अलिबाग येथील :-

| विद्यमान मालकाचे नाव | गट क्रमांक | क्षेत्र हेक्टर आर. चौरस मीटर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| तिलकराज जगदीश मुखी | ४७८ | ०-०४-० | १.०० |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : २०/०६/२०२४

**ॲड. रविंद्र विनायक ओक**
'गुरूकृपा', अलिबाग अर्बन बँकेजवळ,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **TenderNo:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/ Tech/Tender-26/2024-25 Date:-20.06.2024 RFx No.7000031634 | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for the work of cutting & chopping tree in hilly area at various 220/100 kV EHV Lines under EHV (O&M) Dn. Mahad for the year 2024-25. | **Rs.20,41,956/- (including GST + 1% Labour CESS)** |
| 2. | **Tender No:-** EE/ EHV (O &M ) / DIVN/MHD/Tech/E-Tender - 27/2024-25Date:-20.06.2024 RFxNo.7000031647 | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for the work of monkey patrolling of various 220/100 kV EHV Lines under Line maintenance Sub Division Mahad under EHV (O&M) Dn. Mahad for the year 2024-25. | **Rs. up to 20,18,313/- (Including GST+ 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.

Bid submission is from 20.06.2024 @ 00:00 hrs to 26.06.2024 @23:59Hrs for above tender

For further details visit our website:- https://srmetender.mahatransco.in.

**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

Note:All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**Executive Engineer EHV(O&M) Dn. Mahad**

निवडक

## अज्ञाताने केली चोरी

**माणगाव :** घरातील खोलीच्या दरवाजाची कडी हत्याराने तोडून घरातील २२ हजार रुपयांची रोख रक्कम चोरून अज्ञात चोरटा फरार झाला आहे. सदरची घटना गोल्डन पार्क रेसिडेन्सी माणगाव या ठिकाणी घडली.फिर्यादी अमोल साळवे यांच्या गोल्डन पार्क रेसिडेन्सी, पहिला मजला रूम नं.१०३ बी माणगाव येथील राहत्या घरातील खोलीच्या दरवाजाची कडी कोणत्यातरी हत्याराने तोडून घरात प्रवेश करून अज्ञात इसमाने घरातील २२ हजार रुपयांची रोख रक्कम चोरली.

## किसान दिवस साजरा

**उरण :** उरण तालुक्यातील केगाव ग्रामपंचायत येथे उरण तालुका कृषी विभाग वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम उरण तालुका कृषि अधिकारी अर्चना सूळ-नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली केगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयात शेतकऱ्यांना पीएम किसान उत्सव दिवस साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने पीएम किसान योजनेची सविस्तर माहिती देण्यात आली. या कार्यक्रमामध्ये कृषी योजनांची माहिती देऊन मार्गदर्शन करण्यात आले.

## भाजी विक्रेत्याची आत्महत्या

**खोपोली :** भाजी मंडईतील भाजी विक्री करणाऱ्या तरुणाने रेल्वे रुळावर झोपून आपली जीवनयात्रा संपविली. खोपोली शहरातील भाजी मंडईमध्ये भाजी विक्री करणारा खोपोली शहरातील वीणानगर भागात श्री कॉम्प्लेक्स सोसायटीमध्ये वास्तव्यात असणारा संतोष भिसे या तरुणाने सायंकाळी खोपोली रेल्वे स्थानकातून मुंबईकडे सायंकाळी ६ वाजता जाणाऱ्या रेल्वेखाली वासरंग गेटजवळ रेल्वे रुळावर झोपून आपली जीवनयात्रा संपविली. या आत्महत्येचे कारण मात्र समजू शकले नाही.

## राजेंद्र वालेकर सेवानिवृत्त

**सोगाव :** रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खिडकीचे निवृत्त शिक्षक तथा यादव चौली गवळी समाजाच्या शिक्षण समितीचे सचिव राजेंद्र वालेकर यांच्या सेवानिवृत्ती निमित्त कार्यक्रम वाघोली येथील श्री राधा-कृष्ण मंदिरात आयोजित केला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश गुरव यांनी केले तर स्वागत रमेश पाटील यांनी केले. प्रारंभी सत्कार मूर्तीस औक्षण राजश्री वालेकर,वत्सला वगरे, पुष्पलता डबरे, अरुणा वालेकर, सखूबाई वालेकर, सुवर्णा वालेकर यांनी केले.

## शैक्षणिक साहित्य वाटप

**सोगाव :** सक्षम एज्युकेशन सोसायटी तर्फे रविवारी (दि.१६) कामार्ले येथे अंगणवाडी ते १५ वी पर्यंत शिकत असलेल्या सुमारे १०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. शैक्षणिक क्षेत्रात काम करत असलेल्या सक्षम एज्युकेशन सोसायटीतर्फे कामार्ले गावात हा तिसरा शैक्षणिक कार्यक्रम राबवण्यात आला. याप्रसंगी सक्षम तर्फे शार्दूल काठे, श्रीमती शुभांगी कुलकर्णी, विशाल आमले, राम कदम, किसन गायकवाड, सिध्दराज तरंगे आणि प्रतीक म्हात्रे उपस्थित होते.

# यंदाही खड्ड्यांतूनच प्रवास

## अलिबाग-रोहा मार्गावर चिखल, मातीचा भराव; प्रवाशांचा भ्रमनिरास

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मोठा गाजावाजा करीत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अलिबाग - रोहा मार्गावरील रस्त्याच्या कामाला गेल्या वर्षी सुरुवात झाली. यंदा पावसाळ्यात खड्ड्यातून जाण्याचा त्रास कमी होणार अशी अशा प्रवाशांना होती. मात्र या मार्गावरील प्रवाशांची मोठी भ्रमनिराशा झाली आहे. यावर्षीदेखील पावसाळ्यात खड्डे व चिखलातूनच प्रवास करण्याची वेळ प्रवाशांवर आली आहे.

अलिबाग - रोहा मार्गावरील प्रवाशांचा प्रवास सुखकर व आरामदायी व्हावा यासाठी शासनाकडून १५० कोटीहून अधिक रुपये मंजूर करण्यात आले. गेल्यावर्षी गुढीपाडव्याला २२ एप्रिलपासून रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यात आला. मोठा गाजावाजा करीत बांधकाम विभागाने या रस्त्याचे काम सुरु केले. बेलकडेपासून वढावपर्यंत डांबरीकरण करण्यात आले. त्यानंतर वेलवली-खानाव ते उसर गेल कंपनीपर्यंत कॉंक्रिटीकरणाला सुरुवात झाली.

एका बाजूचे कॉंक्रिटीकरण करण्यात आले. दुसऱ्या बाजूचे कॉंक्रिटीकरणाचे काम थांबविण्यात आले. त्यामुळे या मार्गावरून वाहतूक करणे कठीण होऊन बसले.





अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्याच्या रुंदीकरणाबरोबरच डांबरीकरणाचे काम करण्यात आले आहे. या कामाला गती न मिळाल्याने उपअभियंता यांच्याविरोधात कारवाई करण्यात आली आहे. त्यांना लेखी पत्र दिले आहे. परंतु पावसाळ्यात नागरिकांसह प्रवाशांचा प्रवास सुरक्षित व्हावा यासाठी खड्डे बुजविण्याचे आदेश देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांसह अन्य प्रवाशांना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घेण्याचा प्रयत्न केला आहे.

- जे. ई. सुखदेवे, कार्यकारी अभियंता, अलिबाग

कंपनीच्या अवजड वाहनांना वाहतुकीला अडथळा निर्माण झाल्यास त्याठिकाणी मातीचा भराव करण्यात आला. तसेच वावेपासून रुंदीकरणाच्या नावाखाली खडी, मातीचा भराव केला. परंतु पावसाळ्यात ही खडी बाहेर निघत आहे. मातीच्या भरावामुळे चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे पावसाळ्यात यंदाही खड्ड्यातून प्रवास करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कूर्मगतीच्या कामामुळे यावर्षीदेखील चिखल मातीतूनच प्रवास करावा लागणार आहे. या चिखल, खडी, मातीमुळे अपघात होण्याची भिती निर्माण झाली आहे.

### वावे-बेलोशीतून प्रवास जीवघेणा

अलिबाग तालुक्यातील बेलोशी वावे रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. या रस्त्यावरून प्रवास करणे कठीण होऊ बसले आहे. या रस्त्यासाठी लाखो रुपये मंजूर झाले आहे. मात्र या कामाला अद्यापर्यंत सुरुवात झाली नाही.सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्काळजीपणामुळे या रस्त्यावरील प्रवास जीवघेणा होऊ लागला आहे. गेल्या काही वर्षापासून पावसाळ्यात या रस्त्यावर खड्ड्यातून प्रवास करावा लागत आहे. याकडे मात्र सार्वजनिक बांधकाम विभाग गांभीर्याने लक्ष देत नसल्याची खंत प्रवासी वर्गाकडून व्यक्त केली जात आहे.

### रिक्षा चालकांनी जपली माणुसकी

बेलोशी-वावे रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहे. दगड बाहेर आले आहेत. पावसाने सुरुवात केल्याने या रस्त्याला तळ्याचे स्वरूप येऊ लागले आहे. विद्यार्थ्यांसह अन्य प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहे. त्यामुळे वावे येथील रिक्षा चालक व मालकांनी माणुसकी दाखवत काही खड्डे श्रमदानातून बुजविण्याबरोबरच सखल भागात साचलेले पाणी काढले. मात्र सार्वजनिक बांधकाम विभाग बघ्याची भूमिका घेत आहे.

# खालापुरात जातीच्या दाखल्यांचे वाटप



**। रसायनी। वार्ताहर ।**

कोकण विभागीय आयुक्त पी. वेलरासु, जिल्हाधिकारी रायगड किसन जावळे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, उप विभागीय अधिकारी कर्जत अजित नैराळे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी श्रीमती शशिकला अहिरराव, तहसीलदार खालापूर आयुब तांबोळी, मंडळ अधिकारी पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर तालुक्यातील नावंढे वाडी, घोडीवळी वाडी, हाल वाडी येथील कातकरी जमातीतील लोकांचे जातीचे दाखले वाटप करण्यात आले.

टाटा स्टील फाऊंडेशनच्या वतीने पहचान प्रकल्पांतर्गत खालापूर तालुक्यातील आदिवासी वाड्यांवर जातीच्या दाखल्यांचे शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरांमध्ये वाड्यावस्त्यांवरील कातकरी समाजातील लोकांचे जातीच्या दाखल्यासाठी अर्ज तयार करण्याचे काम उरण सामाजिक संस्थेने केले त्यास महसूल विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी सहकार्यकेले.टाटास्टीलफाऊंडेशन यांनी पहचान प्रकल्पांतर्गत पुढाकार घेतला आणि उरण सामाजिक संस्थेच्या माध्यमातून सदरहू उपक्रम यशस्वी पणे राबविला. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण यांच्या वतीने प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव आणि निरिक्षक दळवी यांनी खूप सहकार्य केले. भावेश रावल आणि उदय गावंड यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, सरचिटणीस संतोष पवार, उपाध्यक्ष दिनेश घरत यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड भूषण दत्ता गोंधळी, सामाजिक कार्यकर्ते नामदेव ठाकूर, सदस्य मनीष कातकरी यांनी मेहनत घेतली.

## सोनसडे येथे भाजीपाला बियाणे वाटप

**तळा :** तळा तालुक्यातील सोनसडे येथे कृषी विभाग तळा आत्माअंतर्गत शेतकऱ्यांना भाजीपाला बियाणे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी गावचे अध्यक्ष देवजी गावडे, सचिव कृष्णा भोसले, रविंद्र पाटेकर, परशुराम भोसले, कृषी सहाय्यक योगेश कोळी व शेतकरी बंधू भगिनी उपस्थित होते. शेतकरी बांधवांना भाजीपाला लागवड करुन झाल्यानंतर जे बियाणे देण्यात येते त्याचा फारसा फायदा होत नाही. त्याचबरोबर यावेळी भेंडी, मिरची, पालक, व चवळी ही बियाणे आहेत. यामध्ये बदल करून कोकणात पडवळ, दुधी भोपळा, शिराळा, काळा भोपळा यासारखी परसबागेत फुलणारी बिबियाणे द्यावीत ही भाजी या भागात येते याचा विचार होणे गरजेचे आहे.



# बघेपणाची कीड

आरती यादवचा खून भीषण आहे. अंगावर शहारे आणणारा आहे. पण अगदीच धक्कादायक नाही. आरती ही २२ वर्षांची मुलगी. मुंबईच्या नालासोपारा उपनगरात राहत होती. २९ वर्षांच्या रोहित यादवने मंगळवारी तिची हत्या केली. रोहित व तिचे प्रेम होते. ते लग्नही करणार होते असा रोहितचा दावा आहे.अलिकडे काही कारणाने ती त्याला टाळू लागली होती. त्या रागातूनच त्याने आरतीला डोक्यात स्पॅनर मारून संपवले. सकाळी साडेआठच्या सुमारास भर भरस्त्यात ही घटना घडली. मिडियाने तिला मोठी प्रसिध्दी दिली. अशाच जुन्या घटना कोणत्या झाल्या आहेत याची आठवण काढली. पाहता पाहता लोकांना अनेक घटना आठवल्या. ही भयानक घटना असली तरी फार अभूतपूर्व नाही असा निष्कर्ष निघाला. आता पोलिस चौकशी चालू राहील. सुरुवातीला एक-दोन दिवस त्याच्या बातम्या येतील. नंतर लोक त्याविषयी विसरून जातील. आता अशीच एखादी घटना घडेल तेव्हा आरतीची आठवण निघेल. आरतीच्या खुनातला आणखी एक तपशील सर्व मिडियामध्ये झळकला आहे. रोहित तिला मारत असताना रस्त्यावर अनेक येणारे-जाणारे होते. ते सर्व जण काय होते आहे हे पाहत थांबले. काही जणांनी तर मोबाईलवर घटनेचे व्हिडिओ घ्यायला सुरूवात केली. नंतर थोड्याच वेळात त्यांनी ते आपल्या फेसबुक, इन्स्टाग्रामवर टाकले. मात्र यापैकी कोणीही आरतीच्या मदतीला धावून गेला नाही. रोहित हा एक किरकोळ प्रकृतीचा तरुण आहे. तीन-चार जणांनी त्याला घेरले असते तर ते त्याला सहज रोखू शकले असते. खून केल्यानंतर तो तिथेच बाजूला रस्त्यावर बसून राहिला होता. तरीही त्याला कोणी पकडले नाही. एरवी अशी घटना घडून गेल्यानंतर का होईना काही लोकांचे शौर्य जागे होते. ते गुन्हेगाराला मारू लागतात. पण तसे काहीही घडले नाही. जणू हा काहीतरी सिनेमातला किंवा सोशलमिडियातयेणाऱ्यारील्समधला प्रकार असावा अशा निर्विकारपणे लोक त्याच्याकडे पाहत होते.

### रील्स नावाची विकृती

आरतीच्या खुनाइतकीचआपल्या समाजात तयार झालेला हा बघेपणा भयंकर आहे. खून होताना दहशतीचा माहोल तयार होतो. लोक तिथून पळून जायला पाहतात. ते समजण्यासारखे आहे. त्यातही जे थोडे धाडसी असतात ते त्या खुन्यालारोखता किंवा पकडता कसे येईल हे पाहतात. किमान आरडाओरडा करतात. खुन्याला थांबवण्याचा किंवा त्याच्या अंगावर धावून जाण्याचा प्रयत्न करतात. पण इथे यातले काहीच घडलेले दिसत नाही. टीव्हीवरच्या मालिकेत किंवा बातम्यांमध्ये पाहावी तशा थंडपणे सर्व जण ही घटना पाहत राहिले. एका जिवंत तरुणीवर खरोखर वार होत आहेत व तिचा जीव घेतला जातो आहे हे लोकांना जणू जाणवलेच नाही. हा बधीरपणा अत्यंत धक्कादायक आहे. आरतीच्या खुनाचा तपास तर व्हावाच. पण समाजाने आपल्या स्वतःच्याबधीरपणाचाही थोडा विचार करण्याची वेळ आली आहे. पूर्वी सिनेमांमधील हिंसाचारामुळे लोकांच्या भावना बोथट होत चालल्याचे म्हटले जाई. पण सोशलमिडियामुळे सर्व परिमाणे बदलून टाकली आहेत. सिनेमे ही कधीतरी पाहण्याची गोष्ट होती. ते थिएटरमध्ये जाऊन पाहावे लागत. पण मोबाईल आणि सोशलमिडियाने हे चित्रच बदलून टाकले आहे. आता चोवीस तास व ३६५ दिवस सिनेमे किंवा कसलेही व्हिडिओज पाहता येतात. वर उल्लेख केलेल्या रील्स नामक प्रकारामुळे तर कहर केलेला आहे. चहा कसा करावा किंवा कपड्यांच्या घड्या कशा कराव्यातइथपासून विमान कसे उडवावे इथपर्यंत कोणत्याही विषयावर रील्स केली जातात. तरुण मुलांनाच नव्हे तर सर्वच थरातील सर्व वयाच्या लोकांना या रील्सनी वेड लावलेले आहे. अनेकदा रील्समध्ये किंवा मोठ्या व्हिडिओमध्येयाहूनही भयंकर आणि लैंगिकदृष्ट्या उत्तान असा मजकूर असतो. तो अगदी लहान मुलेही पाहत असतात.

### धबधब्याचे दुष्परिणाम

मोबाईलमधून दृश्यांचा असा हा धबधबा सतत आदळत असल्याचे दोन परिणाम झाले आहेत. एक म्हणजे आजूबाजूला चालू असलेल्या घटनांकडे लोक रील्सच्या हिशेबातच पाहू लागले आहेत. एखादे नाटक, संगीत किंवा क्रिकेटसारखा सामना पाहायला गेलेल्यांचे लक्ष समोर काय चालले आहे ते पाहण्याकडे कमी आणि त्याचा व्हिडिओ कसा घेता येईल याकडे अधिक असते. साधा एखाद्याच्या वाढदिवसाचा केक कापतानाही हा व्हिडिओचा विचारच अधिक चालू असतो. त्यामुळे प्रत्यक्ष नाटक, गाणे असो की एखादा घरगुती कार्यक्रम यात लोक मनापासून सहभागी होतात की नाही असा प्रश्न पडतो. एखादे गाणे ऐकताना माणूस तल्लीन व्हायला हवा. त्याला इतर गोष्टींचा विसर पडायला हवा. पण तसे होत नाही. या व्हिडिओ संस्कृतीचा, किंवा खरे तर विकृतीचा, दुसरा परिणाम म्हणजे कितीही भयंकर गोष्ट घडली तरी तिच्याकडे प्रेक्षक म्हणून त्रयस्थपणे पाहण्याची वृत्ती लोकांमध्ये येत चालली आहे. आरतीच्या खुनाच्या वेळी नेमके हेच घडले आहे.मोबाईलमधीलव्हिडिओ आणि प्रत्यक्ष एखाद्याचा जीव जात असणे यात फरक करण्याची संवेदनाच समाज गमावून बसत असल्याचे ते चिन्ह आहे. हे काल नालासोपाऱ्यात घडले. पण ते तेवढ्यापुरतेच मर्यादित नाही. हा रोग सर्वत्र झपाट्याने पसरतो आहे.माणूस म्हणून जगणे आपण थांबवत असल्याचे चिन्ह आहे. पशुंमध्येदेखील यापेक्षा अधिक संवेदना असतात. म्हशींच्या कळपातील एखादीवर वाघाने हल्ला केला तर तो परतवून लावण्याचा बाकीच्या म्हशी होता होईल तो प्रयत्न करतात. त्यांनाही आपापल्या जिवाची भीती असतेच. पण तरीही त्या आपल्या सोबतीणीलावाऱ्यावर सोडत नाहीत. वास्तविक असेही व्हिडिओ लोकांच्या मोबाईलवर येत असतातच. पण त्यापासून आपण धडा घ्यायचा असतो हे मात्र ते विसरून गेले आहेत. कारण, सलमान खान नाश्त्याला काय खातो अशासारख्याव्हिडिओंच्या अध्येमध्ये हा व्हिडिओ येतो आणि लोक तो एक मनोरंजक प्रकार म्हणूनच पाहतात. त्यातूनच नालासोपाऱ्यासारखे बघे तयार होतात. आपल्यातली ही कीड वेळीच रोखायला हवी.

विचार

# भाज्यांचे फटके, उद्योगजगताला झटके

***टोमॅटो, कांदा, बटाट्याच्या भावात अलिकडे मोठी वाढ झाली. एकिकडे हा फटका अधोरेखीत होत असताना इलेक्ट्रीक स्कूटर्सची प्रमुख निर्माती असणारी एथर कंपनी संभाजीनगरमध्ये एक हजार कोटींची गुंतवणूक करणार असल्याची बातमी आली. दरम्यान, टीसीएसला अमेरिकेत मोठा झटका बसल्याची आणि वाहननिर्मितीमध्ये 'महिंद्रा'ने 'टाटा मोटर्स'ला मागे टाकल्याची बातमी उद्योगजगतातील झटके दाखवणारी ठरली.***



**महेश देशपांडे**

अर्थनगरीमध्ये कैक लक्षवेधी बातम्या चर्चेत असल्या तरी चार बातम्यांनी खास लक्ष वेधले. उद्योजक आणि सामान्यांवर परिणाम करणाऱ्या या बातम्या तरंग उमटवून गेल्या. पहिली महत्वाची बातमी म्हणजे इलेक्ट्रीक स्कूटर्सच्या निर्मितीमध्ये महत्वाची भूमिका बजावणारी एथर कंपनी संभाजीनगरमध्ये एक हजार कोटींची गुंतवणूक करणार आहे. दरम्यान, टोमॅटो, कांदा, बटाट्याच्या भावात गेल्या काही काळात ८१ टक्के वाढ झाल्याचे समोर आले आहे. टीसीएसला अमेरिकेत मोठा झटका बसल्याची आणि वाहननिर्मितीच्या स्पर्धेत 'महिंद्रा'ने 'टाटा मोटर्स'ला मागे टाकल्याची बातमी उद्योगजगतातील झटके दाखवणारी ठरली.

ई-व्हेइकल निर्मात्या एथर कंपनीचा देशातील तिसरा प्रकल्प छत्रपती संभाजीनगरमध्ये उभा राहणार आहे. अलिकडेच कंपनीने बिडकीन एमआयडीसीमध्ये शंभर एकर जागा घेतली आहे. तिथे एक हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. या प्रकल्पातून वर्षाला दहा लाख ई-दुचाकींची निर्मिती होणार आहे. तामिळनाडूतील होसूर प्रकल्पात गाड्यांची बांधणी आणि बॅटरीचे काम केले जाते. तिथे चार लाख २० हजार गाड्यांची निर्मिती होते. दरम्यान, शेअर मार्केटमध्ये एथरच्या शेअरला चांगली किंमत आहे. टीव्हीएस आणि बजाजनंतर ई-व्हेइकल निर्मितीमध्ये एथर हा महत्त्वाचा ब्रँड आहे. २०२३-२४ मध्ये कंपनीने एक लाख आठ हजार दुचाकींची विक्री केली. ई-व्हेइकलच्या बाजारात कंपनीचा वाटा १२ टक्के असून या प्रकल्पामुळे छत्रपती संभाजीनगर आणि परिसरामध्ये रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील. एथर गुजरात, कर्नाटक आणि तामिळनाडूमध्ये विस्ताराचा विचार करत होती; मात्र दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरमध्ये हा प्रकल्प असल्यास उत्तर भारतात विस्ताराची संधी मिळेल, याचा विचार करून छत्रपती संभाजीनगरची निवड करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर हे ऑटोमोबाइल हब असल्याने एथरने याच शहराला प्राधान्य दिले. बजाज, स्कोडासारख्या बड्या कंपन्या येथे आहेत. बजाजच्या चाकण येथील प्रकल्पात ई-दुचाकींची निर्मिती होत आहे.

गेल्या वर्षभरात महागाई सातत्याने वाढत आहे. अन्नधान्याच्या महागाईत कोणतीही घट झालेली नाही. गेल्या वर्षभरात बटाटे, कांदे आणि टोमॅटोच्या दरात ८१ टक्क्यांची वाढ झाली आहे. ही बातमी सामान्यांसाठी दखलपात्र आहे. गेल्या १५ दिवसांमध्ये कांद्याच्या घाऊक भावात ५० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या वेबसाइटवरील आकडेवारीवर नजर टाकल्यास गेल्या वर्षभरात बटाटे, कांदा आणि टोमॅटोच्या किमतीत ८१ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे, असे दिसते. देशभरात या तिन्ही भाज्यांच्या सरासरी दरात कमालीची वाढ झाली आहे ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या वेबसाइटनुसार, ३० एप्रिल २०२३ रोजी बटाट्याची सरासरी किंमत १८.८८ रुपये प्रति किलो होती. ती दहा जून २०२४ पर्यंत ३०.५७ रुपये प्रति किलोवर पोहोचली आहे. म्हणजेच बटाट्याच्या दरात किलोमागे ११.६९ रुपयांची वाढ झाली आहे. याचाच अर्थ गेल्या वर्षभरात बटाट्याचे भाव ६२ टक्क्यांनी वाढले आहेत. गेल्या वर्षभरात कांद्याच्या भावात १३.५० रुपयांची वाढ झाली आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या वेबसाइटनुसार ३० एप्रिल २०२३ रोजी कांद्याची सरासरी किंमत २०.४१ रुपये प्रति किलो होती. ती १० जून २०२४ रोजी ३३.९८ रुपये झाली आहे. याचाच अर्थ गेल्या एका वर्षात कांद्याच्या भावात ६६ टक्के म्हणजेच प्रति किलो १३.५७ रुपयांची वाढ झाली आहे. गेल्या वर्षभरात टोमॅटोच्या दरात ६० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. ३० एप्रिल २०२३ रोजी टोमॅटोची किरकोळ किंमत २०.५५ रुपये प्रति किलो होती. १० जून २०२४ रोजी ती ३७.११ रुपयांपर्यंत गेली. म्हणजेच ही वाढ ८१ टक्के आहे.

दरम्यान, दरात वाढ झाल्यामुळे ग्राहकांना फटक बसत आहे. काही दिवसांपूर्वी सातत्याने घसरत असलेल्या कांद्याच्या दराला आता ब्रेक लागला आहे. सध्या कांद्याच्या दरात चांगलीच वाढ होत आहे. त्याचा फायदा शेतकऱ्यांना मिळत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या १५ दिवसांमध्ये घाऊक बाजारात कांद्याच्या भावात ५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. दुसरीकडे देशाची राजधानी दिल्लीमध्ये कांद्याच्या दरात बारा रुपयांची वाढ झाली आहे. सध्या कांद्याचा पुरवठा कमी होत आहे. त्यामुळे दरात वाढ होत आहे. मागणी आणि पुरवठा यातील तफावत हे अलीकडच्या काळात किमती वाढण्याचे मुख्य कारण आहे. जूनपासून बाजारात येणारा कांदा हा शेतकरी आणि व्यापाऱ्यांनी ठेवलेल्या साठ्यातून येतो. २०२३-२४ च्या रब्बी पिकाच्या संभाव्य घसरणीमुळे भाव वाढण्याची अपेक्षा असल्याने शेतकरी त्यांचा साठा उतरवत आहेत.

आता वळू या उद्योगविश्वाकडे. भारतातील सर्वात मोठी आयटी कंपनी असलेल्या 'टीसीएस'ला अमेरिकेत मोठा झटका बसला आहे. अमेरिकेतील एका न्यायालयाने टाटा समूहाच्या आयटी कंपनीला अब्जावधी डॉलर्सचा दंड ठोठावला आहे. कंपनीनेच ही माहिती दिली. टेक्सासच्या नॉर्दर्न डिस्ट्रिक्ट, डॅलस डिव्हिजनच्या युनायटेड स्टेट्स डिस्ट्रिक्ट कोर्टाने कंपनीवर सुमारे १९४ दशलक्ष डॉलर दंड ठोठावला आहे. व्यापार गुपितांचा गैरवापर केल्याच्या आरोपामुळे हा दंड ठोठावण्यात आला आहे. टीसीएसवर 'कॉम्प्युटर सायन्स कॉर्पोरेशन'ने (सीएससी) व्यापार गुपितांचा गैरवापर केल्याचा आरोप केला होता. सीएससी आता डीएक्ससी तंत्रज्ञान कंपनी म्हणून ओळखली जाते. 'टीसीएस'ने शेअर बाजाराला दिलेल्या माहितीनुसार, त्यावर लावण्यात आलेला दंड १९४.२ दशलक्षपेक्षा जास्त आहे. त्यात ५६१.५ दशलक्ष डॉलर नुकसान भरपाई ११२.३ दशलक्ष डॉलरचे अनुकरणीय नुकसान आणि २५.८ दशलक्ष डॉलर व्याजाचा समावेश आहे. भारतीय चलनात दंडाची एकूण रक्कम अंदाजे १,६२२ कोटी रुपये आहे. 'टीसीएस' या आदेशाला आव्हान देईल. तथापि, भारतीय आयटी कंपनीचे म्हणणे आहे, की त्यांच्याकडे न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देण्याचे भक्कम कारण आहे. कंपनी आपल्या हिताचे रक्षण करण्यासाठी आणि न्यायालयाच्या या आदेशामुळे उद्भवणाऱ्या कायदेशीर आव्हानांना तोंड देण्यासाठी आवश्यक पावले उचलण्याची तयारी करत आहे.

दरम्यान, 'महिंद्रा अँड महिंद्रा'च्या नावावर एक मोठी उपलब्धी नोंदवण्यात आली आहे. आनंद महिंद्रा यांच्या नेतृत्वाखालील ही ऑटोमोबाईल कंपनी 'टाटा मोटर्स'ला मागे टाकत बाजार मूल्यांकनाच्या बाबतीत देशातील दुसरी सर्वात मोठी ऑटोमोबाईल कंपनी बनली आहे. 'महिंद्रा अँड महिंद्रा'चे मार्केट कॅप ३,६५,१९३ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. 'टाटा मोटर्स'चे मार्केट कॅप ३,२९,०४१ कोटी रुपये आहे. देशातील सर्वात मोठी ऑटोमोबाईल कंपनी 'मारुती सुझुकी इंडिया लिमिटेड' पहिल्या क्रमांकावर आहे. त्याची मार्केट कॅप चार लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. महिंद्राच्या शेअरमध्ये कमालीची वाढ झाली आहे. कंपनीच्या स्कॉर्पिओ, बोलेरो आणि थार या गाड्यांच्या विक्रीमध्ये उत्तम वाढ झाली आहे. मार्च २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीमध्ये महिंद्राचा निव्वळ नफा २०३८ कोटी रुपये होता. याशिवाय कंपनीकडे २.२ लाख एसयूव्हींचे बुकिंगदेखील आहे. या वर्षी महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडचे शेअर्स बहुतेक वेळा निफ्टीच्या टॉप गेनर्सच्या यादीत आपले स्थान कायम ठेवण्यात यशस्वी ठरले आहेत. गेल्या ५२ आठवड्यांमध्ये या कंपनीच्या शेअरचे मूल्य सुमारे ७१ टक्क्यांनी वाढले आहे. त्यामुळे कंपनीचे बाजार भांडवल २ लाख कोटी रुपयांहून अधिक वाढले आहे. सध्या, 'महिंद्रा अँड महिंद्रा'कडे जगातील सर्वात मोठी ट्रॅक्टर कंपनी होण्याचा मानही आहे. उत्पादन क्षमता वाढवून कंपनी नवीन उत्पादने बाजारात आणणार आहे. कंपनीने २०२५ ते २०२७ या कालावधीत विस्तारासाठी २७ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची योजना आखली आहे.

आजकाल

# गव्हाचा साठा खाली गेला आहे त्याची गोष्ट

**संजीव चांदोरकर**

फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया कडील गव्हाचा साठा सोळा वर्षांत पहिल्यांदा एव्हढा कमी झाला आहे. या बातमीचे राजकीय पेलू काय असू शकतात.

भारत सरकारने तर्फे एफसिआय धान्य खरेदी करते, त्याची साठवणूक करते,

त्या साठ्यातून बऱ्याच गोष्टी साध्य केल्या जातात रेशन, प्रधानमंत्री अन्न योजना राबवल्या जातात; दुष्काळ पडला, सीमेवर युद्ध, आंतरराष्ट्रीय वाहतूक काही कारणांमुळे थप्प झाली, उदा कोरोना काळ, तर मुबलक धान्य साठे कोणत्याही देशाचे सामर्थ्य असते.

एवढेच नाही तर काही कारणांमुळे गव्हाचे भाव वाढले तर एफसीआय आपल्या या साठ्यातून गहू विकून मागणी-पुरवठ्यामधील गॅप भरून काढते, जेणे करून भाव पातळी खाली येते. बातमी आहे

एफसीआयचा हा गव्हाचा साठा, सोळा वर्षात पहिल्यांदा ३० दशलक्ष मेट्रिक टन खाली गेला आहे. ( बिझिनेस लाईन, जून १२ २०२४, पान आठ) बातमी हे देखील सांगते की तांदळाचा साठा वाढत आहे. केंद्र सरकारने आश्वस्त केले आहे कि काळजीचे कारण नाही, गव्हाचा हा साठा पर्याप्त आहे; आणि हे नक्कीच आश्वासक आहे. आपला मुद्दा वेगळा आहे.

गव्हाचा साठा याआधी २००८ सालात एवढा खाली गेला होता. खरेतर २००८ चा साठा हा बेंचमार्क धरता कामा नये; कारण १६ वर्षात लोकसंख्या वाढली आहे; ८० कोटी नागरिकांना मोफत धान्य देण्याची योजना २००८ मध्ये नव्हती आणि मुख्य म्हणजे आंतराराष्ट्रीय परिस्थितीचे संदर्भ वेगाने बदलत आहेत. एफसीआय तर्फे दर हंगामात देशातील शेतकरी कडून गव्हाची मोठ्या प्रमाणावर खरेदी केली जाते; गेली काही वर्षे देशातील गव्हाचे उत्पादन चांगले असून देखील ही खरेदी सतत कमी होत आहे; ती वाढवण्याची गरज आहे.

उदा २०२१ मध्ये तर एफसीआयची खरेदी ४३ दशलक्ष मेट्रिक टन झाली होती; ती २०२४ मध्ये २६ टना वर आली आहे. गव्हाच्या आयातीवर ४० टक्के आयातकर मुद्दामहून जास्त ठेवला आहे; ज्यामुळे व्यापाऱ्यांना गहू आयात करणे किफायतशीर ठरत नाही.

केंद्र सरकारवर दबाव आहे हा आयातकर कमी करण्यासाठी; दबाव आयात करू पाहणाऱ्या व्यापारी वर्गाचा असणार आणि मुख्य म्हणजे धान्याचा आंतरराष्ट्रीय व्यापार करणाऱ्या महाबलाढ्य बहुराष्ट्रीय कंपन्यांचा असणार.केंद्र सरकारवर दबाव आहे युक्रेन/ रशियाकडून कि भारताने त्यांच्याकडून गहू खरेदी करावा. उद्या गव्हा बाबतची वरील धोरणे बदलली तर त्याचा संबंध, त्याचे समर्थन एफसीआयच्या सतत घातलेल्या गव्हाच्या साठ्याशी जोडून दाखवला जाणार.

ही राजकीय अर्थव्यवस्थासमजून घेतली पाहिजे.

कहीपे निगाहे, कहिपे निशाना!

एफसीआयची गहू खरेदी काही वर्षे कमी होण्याचे एक कारण सांगितले जाते ते म्हणजे खाजगी व्यापारी न्यूनतम खरेदी किमतीच्या थोडी जास्त किंमत देऊन गहू खरेदी करतात. तांत्रिक दृष्ट्या एफसीआय कडील गव्हाची उपलब्धता आयाती मधून वाढवता येते, पण त्यासाठी परकीय चलन खर्ची पडणार;

त्याऐवजी एफफसीआयने देशांतर्गत गहू खरेदी किंमत अधिक ठेवली तर त्यांचा साठा वाढेल, शेतकऱ्यांना चार अधिकचे पैसे मिळतील, त्यातून त्यांची क्रयशक्ती वाढून देशांतर्गत मागणी वाढेल, कर्ज परतफेड अधिक चांगली होईल, देशाची अन्न सुरक्षा अधिक बळकट होईल.

तर आपला मुद्दा आहे शेती/शेतीमालाचे भाव यांच्याकडे एका खाजगी उपक्रमसारखे फक्त रुपयात मोजला जाणारा नफा/ तोटा असे संकुचित निकष न लावता , रुपयात पकडले न जाणारे अनेक लाभ/हानी देखील लावून बघावयास हवे.

या पोस्टसाठी एफसीआय, गहू इत्यादी निमित्त आहे. शेती शिवाय पिण्याचे पाणी, सार्वजनिक वाहतूक, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, विज्ञान/तंत्रज्ञान/वैद्यकीय संशोधन, घरबांधणी अशी अर्थव्यवस्थेची अनेक उपक्षेत्रे आहेत ज्यांना नवउदारमतवादाच्या कमॉडिफिकेशनच्या क्लचेस मधून त्यांना बाहेर काढण्याची नितान्त तातडी आहे; या उपक्षेत्रांचे मूल्यमापन रुपयातील नफा/तोट्याच्या पलीकडे नेण्याची गरज आहे, अधिक समग्र दृष्टिकोन जनमानसात रुजवण्याची गरज आहे.

रुपयातील/वित्तीय तोटा म्हणजे अकार्यक्षमताच हे ब्रेनवॉश केलेले समीकरण तोडून मोडून फेकून देण्याची गरज आहे; या प्रत्येक क्षेत्रासाठी स्वतंत्र कार्यक्षतेचे बेंचमार्क तयार करायची गरज आहे. सगळा गेम पोलिटिकल इकोनॉमीचा नॅरेटिव्ह सेट करण्याचा आहे, मित्रांनो. त्यांच्याकडे जमा होणाऱ्या संपत्तीचे सिक्रेट या नॅरेटिव्ह मध्ये आहे

जून ४ चे निकाल अनेक अर्थाने आश्वासक आहेत; त्यांना समजावून सांगितले कि भारताची सामान्य जनता साथ देतेच देते; आणि अर्थव्यवस्था जनकेंद्री करण्यासाठी देखील देईल.

## लोकसंसद

### बिहार मधील कोसळलेला पूल .... काही प्रश्न

बिहारमधील अरारिया जिल्ह्यातील बाकरा नदीवरील पूल उद्घाटनाच्या अगोदर कोसळला. सुदैवाने या दुर्घटनेत काही जीवित हानी झाली नाही. या तयार झालेल्या पुलाच्या कोसल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. हा पूल बांधण्यासाठी तब्बल १२ कोटी रुपये खर्च झाले आहेत. दिनांक १८ रोजी पावसाच्या जोरदार प्रवाहामुळे हा पूल वाहून गेला. बांधकामाचा दर्जा : हा पूल बांधण्यासाठी जे साहित्य वापरले त्याचा दर्जा काय होता? त्याची तपासणी केली होती काय? पुलाचा खर्च : पूल बांधण्यासाठी जवळपास १२ कोटी रुपये खर्च झाले आहेत. आता परत बांधण्यासाठी कोण पैसे खर्च करणार आहे? या अगोदर सुद्धा पूर्वी बिहारमध्ये पूल पडला होता. अशा घटना टाळण्यासाठी काय करता येईल? याचा सर्वंकष विचार करावा. पूर्वी बांधलेले पूल किती भक्कम आहेत. याचे उदाहरण म्हणजे सांगली महाराष्ट्र येथे असलेला आर्यवीन पूल. या पुलाला शंभर वर्षे होऊनही अजून पर्यंत तो खणखणीत आहे. असे बांधकाम हल्लीच्या पूल बांधणीत का होऊ शकत नाही? याचा विचार सर्वांनीच करणे जरुरीचे आहे.

**- शांताराम वाघ, पुणे**

### जिभेचे चोचले बंद करा

उघड्यावरील आणि रस्त्यावरील वडे, भजी, समोसे, पाणीपुरी, दाबेली वगैरे एरवीही तब्येतीला धोकादायक असतात; पण पावसाळ्यात ते अधिकच धोकादायक बनतात. त्यावर बसणाऱ्या माशा, किटक व थंड वातावरणामुळे जमणारी बुरशी यामुळे रोगांचा प्रादुर्भाव अधिक जलदरित्या होऊ शकतो. म्हणून विविध आरोग्य तज्ञ तसेच



अन्न व औषध प्रशासन विभाग पावसाळ्यात हे पदार्थ टाळण्याचे आवाहन करतात आणि एफडीएची नोंदणी व परवानगी असलेल्या उपहारगृहातूनच अन्नपदार्थ खावेत असे सुचवतात. मात्र तरीही समाजाचा मोठा भाग हे न ऐकता बिनदिक्कतपणे रस्त्यावरचेच अन्नपदार्थ सदान्कदा सेवन करीत असतो. मग तो गरीब असो, मध्यमवर्गीय की श्रीमंत! आपण खात असलेले उघड्यावरील पदार्थ शरीरासाठी अपायकारक आहेत हे माहीत असूनही समाजातील हा मोठा वर्ग ते मिटक्या मारत खात असतात याचे मुख्य कारण म्हणजे त्यांचे जिभेवर नसलेले नियंत्रण. वर उल्लेख केलेले सर्व पदार्थ म्हणजे जीभेचे चोचले आहेत. जिभेचे चोचले पूर्ण करणे म्हणजे आजारांना निमंत्रण देणे. जोवर जिभेचे चोचले बंद होणार नाही तोवर हे पदार्थ असेच विकले जाणार आणि आजारांना निमंत्रण मिळतच राहणार.

**- श्याम ठाणेदार,** दौंड जिल्हा पुणे

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२० जून**

**१८६३ :** कवी. स्फूट लेखक एकनाथ गणेश भांडारे यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील उंब्रज या गावी १७ ऑक्टोबर १८६३ रोजी झाला. बालपणीच वडील वारल्याने त्यांचे पालनपोषण त्यांच्या वडीलबंधूंनी केले. जबलपुरात मोठ्या भावाकडे राहून शिक्षण पूर्ण केल्यावर रेल्वेत जी.आय. पी. मध्ये तार खात्यात नोकरी पत्करली. १८९९ साली तारमास्तरांचा संप झाला आणि भांडारे यांना नोकरीला मुकावे लागले. पुढे उदरनिर्वाहासाठी त्यांनी 'हिंदूपंच, कल्पतरू, आणि सुवर्णमाला' या नियतकालिकांचे संपादन केले. तसेच इंदूप्रकाश 'मासिक मनोरंजन', केरळ, कोकिळ' या नियतकालिकांतून गद्यलेखनही केले. साहित्य लेखनाची सुरूवात त्यांनी जगन्नाथाच्या करूणाविलापाच्या मराठी काव्याच्या भाषांतराने केली. शेक्सपिअर, वर्डस्वर्थ, टेनियन आदी पाश्चात्य कवितांच्या आधारे त्यांनी काव्यलेखन केले. त्यांनी केलेल्या इंग्रजी कवितांची भाषांतरे मुक्तांजलमध्ये एकत्रित करण्यात आली. त्यांनी काही विलापिकाही रचल्या. याशिवाय वेश्यागमनाचे दुष्परिणाम दाखवणारे कामकंदनकला हे नाटक तसेच कामसेन राजाचा वध हे त्यांचे गद्यपद्यात्मक नाटक प्रसिद्ध आहे. काव्यरचनेबरोबर तत्कालिन नियतकालिकांतून त्यांनी गद्यलेखनही केले. प्रसादपूर्ण भाषेत काव्यानुरूप विषयांवर पद्यबद्ध रचना करणाऱ्या भांडारे यांचे २० जून १९११ रोजी निधन झाले. **१८९०:-** ज्योतिष शास्त्राचे अभ्यासक, सायनमताभिमानी लेखक नारायण सदाशिव मराठे यांचा जन्म. मुंबईत त्यांनी ज्योतिषशिक्षणाचा वर्ग व हर्षल पुस्तकमाला चालवत असत. 'स्पष्ट ग्रहांचा उपयोग' हे त्यांचे पुस्तक ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासकांना उपयुक्त करत असे. **१९२४:-** लेखक आणि स्वा.सावरकरांच्या साहित्याचे अभ्यासक प्रा.डॉ. प्रभाकर लक्ष्मण गावडे यांचा जन्म. यांनी 'सावरकर एक चिकित्सक अभ्यास', 'सावरकरांचे साहित्य', 'चिंतन', 'स्वा.सावरकरांचे साहित्य विचार' ह्या ग्रंथासह ङ्गकवी यशवंत ह्यांच्या काव्याचे रसग्रहफ आणि ङ्गकथा-कौस्तुभ व माध्यामिक व शालेय व मराठी व्याकरण व निबंध लेखनफया पुस्तकांचे ते सहलेखक आहेत. **१९४३:-** विविध वृत्तपत्रात स्तंभलेखन तसेच सूत्रसंचालन, निवेदन कथाकथन आदींचे वृतांतलेखन करणाऱ्या लेखिका सुषमा रत्नाकर नानोटी यांचा जन्म. 'आई' या व्यावसायिक नाटकासह अनेक एकांकिका त्यांनी लिहिल्या तसेच नागपुर आकाशवाणीवरुन नभोनाट्य, बालनाटिका लेखन केले. याशिवाय 'संस्कृत व्याकरण आणि निबंध', 'निबंध व व्याकरणावरचे पॉकेट बुक्स प्रसिध्द'. तसेच 'मध्यरात्रीचं चांदणं' हा कथासंग्रह व ज्ञानेश्वर माऊलींचे चरित्रे त्यांनी लिहिले. **१९४४:-** विविध वृत्तपत्र आणि अंकातून लेखन करणारे कवी, कथाकार वसंत विश्वनाथ मोगरे यांचा जन्म. **१९६०:-** लेखक हिंमत किसनराव शेकोकार यांचा जन्म. 'आयुदय', 'अंकुर' हे काव्यसंग्रह प्रकाशित. तसेच विविध वृत्तपत्रातून काव्य आणि स्तंभलेखन याशिवाय जपानी काव्यप्रकार 'हायकू' वर विशेष श्रम घेऊन १५०हून अधिक हायकू लिहिले. **१९६९:-** कवी आणि समीक्षक या दोन्ही व्यासपीठावरील एक प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणून आज ओळखले जाणारे साहित्यिक महेश कुंडलीकर यांचा जन्म. 'देगलूर गौरव गान' हा त्यांचा प्रकाशित काव्यसंग्रह तसेच 'जलबोध' या काव्यसंग्रहासह 'बिनपटाची चौकट समीक्षा आणि रसास्वाद' या पुस्तकात पुस्तकपरीक्षणाचा समावेश. याशिवाय महाराष्ट्रातील नामांकित विविध दैनिक, नियतकालिकातून लेख, प्रासंगिक लेख, पुस्तक परीक्षणे, कविता, मुलाखतीचे लेखन त्यांनी केले. **१९९७:-** 'मराठीतील पहिले शायर' असा लौकिक असलेले वासुदेव वामन पाटणकर, म्हणजेच 'जिंदादिल' भाऊसाहेब पाटणकर यांचे निधन. 'जिंदादिल' हा त्यांचा संग्रह प्रसिध्द आहेच. 'आजवर बेधुंदतेने मांड जैसा गाविला, त्याच त्या तल्लीनतेने जोगियाही गायिलाफ अशा शब्दांत त्यांनी आसक्ती आणि वैराग्य हे दोन्ही गुण शायरीत कसे असतात, याचे वर्णन केले आहे. पाटणकरांच्या आधीही शायरीचे तंत्र मराठीत वापरले गेले होते, पण 'शायरांना जिंदादिली' पाटणकरांनीच मराठीत आणली. **२००८:-** अभिनेते चंद्रकांत गोखले यांचे निधन. अभिनयामुळे लेखनाला फार वेळ देऊ न शकलेल्या गोखले यांनी 'चंद्रकिरण' या आत्मचरित्रातून आपल्या जडणघडणीची आणि चित्रपटसृष्टीतील सात ते आठ दशके झालेल्या वावराची कहाणी चितारली आहे.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२० जून

१) श्री. अविनाश राईलकर
ब्राह्मणआळी, अलिबाग
२०-०६-१९४७

२) श्री. मधुकर शांताराम प्रधान
पिंपळभाट, ता. अलिबाग
२०-०६-१९५०

३) श्रीम. स्मिता सीताराम भगत
वाडगाव, अलिबाग
२०-०६-१९५८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.


**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते



**श्री. महेश उमाकांत पवार, वाढदिवस अलिबाग**



**३. श्री व सौ दिप्ती तेजस कोलते, १० व्या लग्नदीनानिमित्त, अलिबाग**



**४. स्व. सौ. सिताबाई देवचंद मेहता, ४२ व्या पुण्यतिथी स्मरणार्थ, पाली ( सुधागड)**

**श्री. महेंद्र पोतनीस, वाढदिवस अलिबाग**

**कै. मारुती महादेव मालवणकर, स्मरणार्थ अलिबाग**

# आंबिवली येथील पथदिव्यांची बत्ती गुल

## ग्रामपंचायतीचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष?

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

गृप ग्रामपंचायत माजगांव हद्दितील आंबिवली येथिल रस्त्यालगत पथदिवे बसविण्यात आले आहेत. मात्र, मागील महिन्यापासून हे पथदिवे बंद असल्यामुळे येथिल नागरिक नाराजी व्यक्त करीत आहे. विषेश म्हणजे या पथदिव्यांची चाचणी घेण्यासाठी हे दिवे मध्यांतरी लटकलेल्या अवस्थेत असल्यामुळे हे केव्हा उजेड देणार, असा प्रश्न ग्रामस्थांच्या पुढे निर्माण झाला आहे.

माजगांव हद्दित अनेक ठिकाणी हे पथदिवे आहते. मात्र, आंबिवली येथील असलेले पथदिवे बंद स्वरुपात असल्यामुळे हे केव्हा उजेड देणार, याकडे सर्वांचे लक्ष्य वेधले गेले आहे. या ठिकाणी सावरोली खारपाडा रस्त्यावर अंधार असल्यामुळे सुरक्षतेच्या दृष्टिकोनातून हे दिवे लावण्यात आले होते. शिवाय हे सात ते आठ पथदिवे एकाच रांगेत असल्यामुळे १० ते १२ फुटावर टांगते ठेवण्यांत आले आहेत. येथे भर पावसात रहदारी करणाऱ्या ग्रामस्थांना रात्रीच्या वेळी मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यावर ग्रामस्थांची समस्या विचारात घेण्यासाठी ग्रामपंचायत जाणीवपूर्वक दुर्लक्ष्य करीत असल्याचा आरोप येथिल ग्रामस्थ करत आहेत.




> **हे पथदिवे मेढा योजने अंतर्गत बसविण्यात आले असून ज्या कंत्राटदारांना हे काम दिले आहे ते आमचा फोन उचनलत नाहीत. यामुळे हे काम थांबले आहे. मात्र, आम्ही सातत्याने त्यांच्या संपर्कात आहोत.**
>
> **– संदिप धारणे, ग्रामसेवक, माजगांव**

> **आंबिवली येथिल बस थांब्यावर पथदिवे बसविण्यात आले आहेत. मात्र, अजूनही ते बंद स्वरुपात असून गेले अनेक दिवस याच स्थितीत आहेत. त्याचबरोबर हे पथदिवे मध्यांतरी लटकलेल्या स्थितीत ठेवण्यात आल्यामुळे अपघाताची समस्या निर्माण होऊ शकते.**
>
> **– गोपीनाथ जाधव, माजी सरपंच**

# तळ्यात मुसळधार पाऊस



**। तळा । वार्ताहर ।**

आठ दिवसाच्या विश्रांतीनंतर तळा तालुक्यात बुधवारी सकाळपासून पावसाने जोरदार पुनरागमन केले. त्यामुळे बरेच दिवस पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या बळीराजाला दिलासा मिळाला असून बळीराजा शेती लावणीच्या कामात व्यस्त झाला आहे. सुरुवातीस मुसळधार कोसळलेल्या पावसाने गेल्या आठवडाभरापासून विश्रांती घेतली होती. त्यामुळे शेतीची कामे देखील रखडली होती. तालुका डोंगराळ असल्याने शेतीसाठी उभ्या पाण्याची अधीक गरज असते. यंदा भात शेतीत आलेले आवण लावणी योग्य झाल्याने बहुतांश शेतकऱ्यांनी आपल्या शेतात नांगरणी करुन मातीची फोड देखील करून ठेवली होती. केलेली फोड पाऊस नसल्याने संपूर्ण सुकून गेली होती. तर, काही ठिकाणी पाण्याअभावी भाताची रोपे पिवळी पडू लागली होती. काही जणांनी हंड्याने पाणी आणून रोपे जगवण्यासाठी प्रयत्न केला होतो. परंतु, बुधवारी सकाळपासून तालुक्यामध्ये मुसळधार पावसाला सुरुवात झाली असल्यामुळे आता शेतामध्ये पाणी तुंबून शेतकऱ्यांना लावणी करणे शक्य होणार आहे.

# मैत्रांगण पुस्तकाचे प्रकाशन

**कोर्लई :** जंजिरा विद्या मंडळ संचलित मुरुडच्या सर एसए हायस्कूल सन १९७२-७३ बॅचतर्फे मैत्रांगण या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा पनवेल येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी आनंद रणदिवे यांनी मैत्रांगण पुस्तकाची जडणघडण कशी झाली याबाबत भाष्य केले. त्यानंतर अमेरिकन निवासी वर्ग मित्र डॉक्टर किशोर मेहता यांच्या हस्ते मैत्रांगण पुस्तक प्रकाशन संपन्न झाले. यावेळी अविनाश साळी यांनी मैत्रांगण पुस्तक प्रकाशन सोहळ्यासाठी डॉ. गिरीश सबनीस, डॉ. किशोर मेहता, आनंद रणदिवे, सुनील प्रधान, सुरेन करंबे, अलका पालवणकर, अनिल पुलेकर, वासंती हणमंते, राम भोसले, जया ठाकूर, नंदकुमार भगत, विनोद भगत, कुमार खोत, वर्षा बागवे, कुंदा चाफीलकर, नैनीता कर्णिक, जगदिश वोरा यांच्या सहभागातून हा कार्यक्रम यशस्वी झाला याबद्दल आभार मानले.

# बळीराजा सुखावला

**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**

मोसमी पाऊस येणार असल्याची प्रतीक्षा अखेर संपली आहे. मुरूड तालुक्यात बुधवारी (दि.१९) पहाटे पावसाचे आगमन झाल्याने बळीराजासह ग्रामस्थ सुखावले आहेत. यावेळी अनेकांनी पहिल्याच मोसमी पावसात चिंब- चिंब भिजण्याचा आनंद लुटला आहे. बळीराजा तर कमालीचा आनंदित झाला आहे. तसेच, बुधवारपर्यंत २९४ मिमी पाऊस पडल्याची माहिती तहसील सूत्रांनी दिली आहे. मुरूड तालुक्यात १० जूनला बिगर मोसमी पावसाने जनतेची अचानक दाणादाण उडवून दिली होती. तीन तासात १५४ मिमी पाऊस पडला होता. त्यामुळे हा पाऊस सुरू राहील असा काहीजणांचा अंदाज सपशेल फोल ठरला होता. अखेर बुधवारी पहाटेपासून पावसाने हळूहळू जोर धरायला सुरुवात केल्याची माहिती तालुक्यातील शेतकऱ्यांनी दिला आहे. दरम्यान, तालुक्यातील भात पेरणी पूर्ण झाली असून शेतकरी वर्ग राब वर येण्याची प्रतीक्षा करीत आहेत. पाऊस सुरू झाल्याने जमीनीला थंडावा आला असून राब वर येईपर्यंत किमान ८ दिवस तरी आम्ही शेतात गवत काढणे आणि अन्य स्वच्छता करण्याची कामे करणार असल्याची माहिती वाणदे गावचे जेष्ठ शेतकरी तुकाराम पाटील यांनी दिली.

# परी फाऊंडेशनतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

उन्हाळी सुट्टीनंतर जून महिना आला की वेध लागतात ते शाळेचे. कधी एकदा १५ जून येतो आणि शाळेत जाऊन आपल्या मित्र मैत्रिणींना भेटून सुट्टीतील गंमती जमती सांगतो, असे विद्यार्थ्यांना वाटत असते. दुकानात शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी लगबग सुरू झालेली दिसून येते. परंतु, भाले शाळेतील विद्यार्थ्यांना मात्र वह्या, पुस्तके, दप्तर, कंपास, पेन, छत्री, बूट, मोजे, गणवेश सगळं काही शाळेतच मिळते. विविध शासकीय योजना, आजी-माजी विद्यार्थी, समाजातील दानशूर व्यक्ती व संस्था यांचेमार्फत शैक्षणिक साहित्यांची जुळवाजुळव या शाळेची व्यवस्थापन समिती आणि शिक्षकवृंद दरवर्षी करताना दिसून येतात. यावर्षी डोंबिवली येथील प्रसिद्ध उद्योजक व परी फाऊंडेशनचे राजेश ढोकरे यांच्यातर्फे स्कूल बॅग आणि छत्र्या तसेच कलर किट असे सुमारे सत्तर हजाराचे साहित्य शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत भेट देण्यात आले. यावेळी राजेश ढोकरे व त्यांची कन्या परी तसेच सरपंच दत्ताअण्णा खांबे, सदस्या अस्मिता चाळके, सुरेखाताई कुपल, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालकवर्ग, शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नऊ गोवंशीय जनावरांची सुटका

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील असलेल्या दामत गावात बकरी ईद साठी नेण्यात आलेली नऊ गोवंशीय जनावरे यांची सुटका करण्यात आली. पोलिसांच्या खबऱ्याचे माध्यमातून मिळालेल्या माहितीनुसार हा छापा टाकून नेरळ पोलिसांनी कारवाई केली. रविवारी (दि.१६) नेरळ जवळील दामत गावातील शब्बीर गुलाम अली नजे यांच्या घराच्या मागील बाजूस असलेल्या गोठ्यात गोवंशिय जनावरे बांधली असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी दामत यांच्या घरी धाड टाकली. त्या धाडीमध्ये पोलिसांच्या पथकाने नऊ गोवांशीय जनावरांची सुटका केली. यात चार गाय वर्णीय तर तीन बैल जातीचे आणि एक वासरू आणि कालवड यांची सुटका करण्यात आली. ही सर्व जनावरे कत्तलीसाठी आणलेली असून त्यांची बाजारभावातील किंमत किमान दीड लाख असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# विभागीय नियंत्रण अधिकाऱ्यांना निवेदन

**। कोलाड । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा महामार्गावरुन जाणाऱ्या काही एसटी बसेस पेण शहर व वडखळ नाका येथून न जाता त्या उड्डाण पुलावरून जातात. याचा परिणाम वडखळ बाजारपेठेवर होत आहे. तसेच, सर्वसामान्य प्रवासी वर्गाला रामवाडी येथे उतरून दुसऱ्या गाडीने प्रवास करावा लागत आहे. यामुळे प्रवाशांना आर्थिक भुर्दंड व त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे एसटी बसेस या उड्डाणपुलाच्या खालून नेण्यात याव्यात, असे लेखी निवेदन विश्वास बागुल यांनी पेणच्या विभागीय नियंत्रण अधिकाऱ्यांना दिले आहे. तसेच पेण, वडखळ, नागोठणे, पाली अशा असंख्य एसटी स्टॅन्डमध्ये पावसाळ्यात अतिशय बिकट अवस्था असते. तरी शासनाने याकडे लक्ष देऊन स्टॅन्डची डागडुजी करावी, अशी ही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.



# केएलई महाविद्यालयात कार्यशाळेचे

**। पनवेल । वार्ताहर ।**

कळंबोली येथील के.एल.ई. संस्थेचे विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात दि. २६ व २७ जून रोजी 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२४' या संदर्भात दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. ही कार्यशाळा मुंबई विद्यापीठ आणि विद्यापीठ अनुदान आयोग ग्रँट कमिशन यांच्या अंतर्गत आयोजित करण्यात येणार आहे. मुंबई विद्यापीठाच्यावतीने रायगड जिल्ह्यामध्ये दोन कार्यशाळा होणार आहेत. त्यापैकी पनवेल, कर्जत, उरण आणि खालापूर तालुक्यातील महाविद्यालयासाठी ही कार्यशाळा कळंबोली येथील के.एल.ई. महाविद्यालय येथे होणार आहे. तरी या तालुक्यातील समाजातील सर्व हितधारकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य प्राध्यापक डॉ.विजय मेंढुळकर यांनी केले आहे.

# वाहतूक कोंडी दूर करण्याची मागणी

**। पनवेल । वार्ताहर ।**

करंजाडे वसाहतीपासून पनवेल रेल्वेस्थानकाला जोडणारी नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन उपक्रम सेवेची बससेवेला वाहतूक कोंडीचे ग्रहण लागले आहे. करंजाडे ते पनवेल रेल्वेस्थानक या पल्यासाठी ११ रुपयांचे तिकीट भाडे असले तरी विलंबाच्या प्रवासामुळे प्रवासी वैतागले आहेत. या मार्गात सर्वात मोठी वाहतूक कोंडी पनवेल शहरातील उरणनाका चौक आणि स्थानक परिसरात तीन आसनी रिक्षांमुळे बस निघण्यासाठी विलंब होत असतो.

करंजाडे वसाहतीमधून एनएमएमटीच्या क्रमांक ७६ बसला पनवेल स्थानकामध्ये पोहोचण्यासाठी अर्धा तासांचा विलंब होत आहे. उरणनाका येथील मासेबाजारामुळे उरण नाका येथे वाहतूक कोंडी होत आहे. विशेष म्हणजे करंजाडे येथून एनएमएमटी बस वाहतूक कोंडीमध्ये अडकत असल्याने प्रवाशांनी तीन आसनी रिक्षातून प्रती आसन २० रुपये देऊन करंजाडे ते पनवेल स्थानक या पल्यावर प्रवास करावा लागत आहे. मात्र, उरण नाका येथे तीन आसनी रिक्षांनासुद्धा वाहतूक कोंडीचा फटका बसत आहे.

> **वाहतूक पोलीस विभागाने पनवेल शहरातील उरणनाका येथील वाहतूक नियमनासाठी पोलीस कर्मचारी तैनात केले आहेत. तसेच, पनवेल रेल्वेस्थानक परिसरात तीन आसनी रिक्षांनी चुकीच्या पद्धतीने रिक्षा उभी केल्याने काही रिक्षांवर दंडात्मक कारवाई केली असून पोलिसांचे कारवाईतील सातत्य सुरुच आहे.**
>
> **–संजय पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल शहर वाहतूक विभाग**







# रविप्रभा मित्र संस्थेची वार्षिक सभा

**। म्हसळा । वार्ताहर ।**

श्री रविप्रभा मित्र संस्था रायगड या संस्थेची नुकतीच वार्षिक सभा दि.१४ जुन रोजी संपन्न झाली. सभेमध्ये २०२२-२३ या वर्षाच्या केलेल्या कामांचे वाचन करण्यात आले व २०२४-२५ या वर्षी घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची सविस्तर माहिती सांगण्यात आली. तसेच, या सभेमध्ये अध्यक्षांच्या सहमताने नविन कार्यकारिणी जाहिर करण्यात आली. यामध्ये उपाध्यक्षपदी नरेश विचारे तर सचिवपदी संतोष उद्धरकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच कार्यकारिणी सदस्य म्हणुन समीर लांजेकर व सुजित काते यांची वर्णी लागली आहे.

यावेळी रविंद्र लाड, नरेश विचार, संतोष उध्दरकर, स्वप्नील लाड, सुशांत लाड, दतात्रेय लटके, नितीन रिकामे आदींबरेबर सर्व सभासद उपस्थित होते.

# हीच खरी मानवतेची पूजा : अनिरुध्द खाडीलकर

## अलिबागमध्ये मसाज व फिजिओथेरपी प्रशिक्षण केंद्र सुरू

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड महाराष्ट्र संस्था संचलित अलिबाग येथील नॅब रायगड मसाज सेंटर येथे दृष्टीबाधीत प्रवर्गातील महिला व पुरुषांना मसाज, ॲक्युप्रेशर, फिजिओथेरपीचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देऊन त्यांना व्यवसायासाठी सक्षमपणे स्वतःच्या पायावर उभे राहता यावे यासाठी संस्थेच्या इमारतीत एक मसाज सेंटर सुरू केले आहे. दृष्टीबाधीतांना सक्षम करणे हीच खरी मानवतेची पूजा करणे, असे प्रतिपादन थळ येथील आरसीएफचे कार्यकारी संचालक अनिरुध्द खाडीलकर यांनी केले. आरसीएफ कर्मचारी वसाहतीमधील मसाज व फिजिओथेरपी प्रशिक्षण केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.



यावेळी नॅब महाराष्ट्राचे अध्यक्ष रामेश्वर कलंत्री, मानद महासचिव गोपी मयूर, सहसचिव डॉ. मुक्तेश्वर मुनशेट्टीवार, जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी डॉ. शाम कदम, आरसीएफचे महाप्रबंधक संजीवजी हरळीकर, महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष साईनाथ पवार, डॉ. शुभदा कुरतडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सुरुवातीला नॅब अलिबागचा ॲक्टिव्हिटी सेंटरच्या संचालिका वृंदा थत्ते यांनी सर्व पाहुण्यांचे शब्दसुमनांनी स्वागत करून प्रशिक्षण केंद्राची माहिती दिली. रामेश्वर कलंत्री, गोपी मयूर यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांना दृष्टीबाधीत महिलांनी तयार केलेल्या व कधीच न कोमजणारा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या कलात्मक कलांचे दर्शन घडविले. नॅब महाराष्ट्राच्या कार्याच्या स्थापनेपासूनच आजतागायत अलिबाग येथील नॅब उपकेंद्राच्या २००२ पासूनच्या कार्याचा आढावा घेऊन कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना शिक्षण व त्याच्या पुनर्वसना संदर्भातील योजनांची माहिती देण्यात आली.

यावेळी डॉ. शाम कदम यांनी सांगितले की, दिव्यांग कल्याण हा समाज कल्याण विभागाचा एक अंग आहे. नॅब संस्थेचे दृष्टीबाधीतांचे कार्य पाहून ही संस्था अलिबागमध्ये २००२ पासून कार्य करत असून दृष्टीबाधीतांना सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देऊन जीवनात उभे राहण्याचे सामर्थ्य निर्माण करीत आहे, ही प्रेरणादायी आहे. संस्थेच्या कार्यास व प्रशिक्षणार्थींना समाज कल्याण विभागाकडून ज्या योजना आहेत, त्यांचा लाभ देण्याबरोबर सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. डॉ. शुभदा कुरतडकर यांनी मसाज प्रशिक्षण देऊन दृष्टीबाधीत महिलांना व पुरुषांना कसे सक्षम केले त्याची माहिती देत प्रशिक्षणार्थ्यांना प्रमाणपत्राचे वितरण करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी मीना मनोज जैन यांनी पाच हजार रुपये व कमळ नागरी पतसंस्थेच्या वतीने संस्थेला पंधरा हजार रुपयांचा धनादेश संस्थेच्या संचालिका वृंदा थत्ते यांना देणगी म्हणून देण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार नॅब महाराष्ट्राचे सहसचिव डॉ. मुक्तेश्वर मुनशेट्टीवार यांनी केले.

# खारघरमध्ये वृक्षारोपण

**पनवेल :** आमदार आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त व शिवसेनेच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून जिल्हा प्रमुख शिरिष घरत यांच्या मार्गदर्शनाखाली शहर प्रमुख गुरुनाथ पाटील यांनी खारघर परिसरातील डोंगरावर जवळपास ५०० वृक्षारोपण करण्याचा उपक्रम शिव सैनिकांच्या साथीने राबविला. खारघर वसाहतीमधील विविध सेक्टर तसेच खारघर हिल व आदिवासी पाडे, डोंगर आदी ठिकाणी त्यांनी झाडांचे वृक्षारोपण केले आहे. तसेच, यांना जगविण्याची जबाबदारी सुद्धा त्यांनी घेतली आहे.

निवडक

## मधुबन कट्ट्यावर काव्यधारा

**उरण :** मधुबन कट्ट्यावर संपन्न झालेल्या १०४ व्या कविसंमेलनात ज्येष्ठ नागरिकांना काव्यरूपी पाऊसधारा अनुभवायला मिळाल्या. कोकण मराठी साहित्य परिषद शाखा उरण तर्फे विमला तलाव उरण शहर येथील मधुबन कट्ट्यावर माजी नगरसेवक माणिकराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन संपन्न झाले. या कविसंमेलनात कवींनी आतुरता पावसाची या विषयावर आपल्या कविता सादर केल्या. कार्यक्रमात नागरिकांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

## संस्कृती भोईरचा इटलीत डंका

**उरण :** नवघर गावाच्या संस्कृती भोईर हिने नवघर गावचे नाव सातासमुद्रापार नेऊन आपल्या कौशल्य बुद्धीच्या जोरावर आपला ठसा उमटविला आहे. संस्कृती हरेश्वर भोईर ही क्यूएसवर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगनुसार जगभरातील १३३ क्रमांकावरील युनिवर्सिटी ऑफ बोलोग्राची स्टुडन्ट ॲम्बेसिटर झाली आहे. युनिवर्सिटी ऑफ बोलोग्राच्या निवडणुकीत संस्कृती भोईर हिची प्रथमच भारतीय ॲम्बेसिटर म्हणून निवड करण्यात आली असून संस्कृती भोईर हिच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## अंबा नदी आढळला मृतदेह

**नागोठणे :** रिलायन्स कंपनीकडे जाणाऱ्या आंबा नदीवरील पुलाखालील खाडीमध्ये अंदाजे ४० ते ५० वयोगटातील एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दीत अंबा नदीवरील पुलाखालील खाडी भागात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह अंबा नदीत पात्रात फुगलेल्या व चांबडी गेलेल्या अवस्थेत तरंगताना शहरातील कोळीवाडा येथील रहिवासी असणारे प्रकाश कोळी यांना दिसून आला. प्रकाश कोळी यांनी नागोठणे पोलीस ठाण्यात संपर्क साधला.

## विद्यार्थ्यांना साहित्य वाटप

**पेण :** पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शाळेतील माजी मुख्याध्यापिका कलावती पाटील यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त पेण शहरातील प्रभाग क्रमांक एकमधील मराठी शाळा क्रमांक दोन येथील शालेय विद्यार्थ्यांना छत्री वाटप आणि मुलींची कन्या शाळा क्रमांक तीन येथील शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे या वाढदिवसानिमित्त पेणमधील पत्रकार बांधव, महिला वर्ग तसेच ज्येष्ठ नागरिक आणि उपस्थित तरूणांनादेखील छत्रीचे वाटप करण्यात आले.

## राज्यस्तरीय निबंध स्पर्धा

**रायगड :** विद्यार्थी उत्कर्ष मंडळाच्या वतीने राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. संपतेय वसुंधरा, आता तरी सुधारा!, ढासळलेल्या राजकारणात-लोकशाहीचा उत्सव, आरोग्यम् धनसंपदा- शिका शरीरावर प्रेम करायला, मराठी रंगभूमीवरील कालानुरूप बदल-लेला कलाविष्कार- एक आढावा!, पोर्श जोरात-यंत्रणा कोमात! असे या निबंध स्पर्धेचे विषय आहेत. अधिक माहितीसाठी ८३६९४२३०८०, ९३२१०८०४९६ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

# खालापुरातील सतरा गावांना खतरा

**। खोपोली । संतोषी म्हात्रे।**



ईर्शाळवाडी सारखी पुन्हा दुर्घटना घडू नये, यासाठी प्रशासन वेगवेगळ्या उपाययोजना राबवत असल्याचे खालापूर तालुक्यात पाहावयास मिळत आहे. आपत्ती व्यवस्थापनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने खालापुर तालुक्यातील १७ गावे दरडग्रस्त घोषित करीत त्यांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांनी अतिवृष्टीचा पाऊस व आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाचा अभ्यास केला असून नैसर्गिक आपत्तीला सामोरे जाण्याची तयारी असताना सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना तशा सूचनाही दिल्या आहेत. त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांनी व अधिकाऱ्यांनी ही सतर्क राहात सर्व नागरिकांना तत्पर सेवा पुरवावी असे आवाहनही तहसीलदार आयुब तांबोळी यांनी केले आहे

खालापूर तालुक्यातील ईर्शाळवाडी येथे गेल्या वर्षी दरड कोसळल्याने मृत्यूचे तांडव पाहावयास मिळले. डोळ्यादेखत आपली आई, मुलगा वडील हे दरड खाली गाडले जात असताना काळीज पिळवटून टाकणारा हा प्रसंग ग्रामस्थांनी पाहिला.या घटनेने संपूर्ण प्रशासन जागे होत त्या ठिकाणी युद्ध पातळीवर उपाययोजना राबविण्यात आल्या. ईर्शाळवाडीत ४३ कुटुंब वास्तव्यास होते. यामधील २ कुटुंब दरड कोसळल्याने उध्वस्त झाले तर ५७ बेपत्ता, २७ मृतदेह सापडले होते. या भयाण दुर्घटनेनंतर अनेकांनी हलहल व्यक्त करत दरड कोसळून मृत्युमुखी पावलेल्यांना आदरांजली वाहली. ईर्शाळवाडीतील दुर्घटनेनंतर शासनाने सतर्क राहत दरडग्रस्त गावांना स्थलांतरित केले होते. स्थलांतरित केलेल्या सर्व नागरिकांना शासनाने सोयीसुविधाही पुरवल्या होत्या.

खालापूर तालुक्यात गतवर्षी ९ गावांचा दरडग्रस्त क्षेत्रात समावेश होता. त्यामध्ये यावर्षी अजून ८ गावांचा समावेश झाला असून तालुक्यातील दरडग्रस्त संख्या १७ वर पोहोचली आहे. खोपोली नगरपरिषद हद्दीतील सुभाषनगरच्या जीएसआयच्या अहवालानुसार यातील काही गावे वर्ग १ मध्ये असल्याने तेथे सावधगिरी बाळगणे गरजेचे असल्याची माहिती प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.तर सुभाषनगर, दत्तवाडी, तोंडली, काजूवाडी, ताडवाडी, गारभाट धनगरवाडी, बिडखुर्द, जांबरुंग, चिंचवली गोहे, टेंबेवाडी, जंगमवाडी, चांगवाडी, हाशाची पट्टी, काटवन, ढेबेवाडी-बर्गे वाडी, मुठा (माडप ठाकूरवाडी) व वीरगाव (कुंभीवली ठाकूरवाडी) अशी १७ गावे दरड ग्रस्त म्हणून घोषित करण्यात आली आहेत.

सन २०२३ ला खोपोली नगरपरिषद हद्दीतील सुभाषनगरचे तात्पुरते स्थलांतर मस्को वर्कर कॉलनी, खोपोली येथे करण्यात आले होते. तालुक्यातील दत्तवाडी येथील लोकांची सोय अनुभविक प्रशिक्षण संस्था नारंगी येथे करण्यात आली होती. काजूवाडी येथील ५ कुटुंबांचे स्थलांतर त्यांच्या नातेवाईकांच्या घरी केले होते.

ताडवाडी येथील दरडप्रवण क्षेत्रातील लोकांचे रायगड जिल्हा परिषद शाळा आंबेवाडी, तर काहींचे चिंचमाळ येथील साई मंदिरात सोय केली होती. गारभाट धनगरवाडी ही खालापूर व कर्जत तालुक्याच्या सीमेवर असून त्यांना जवळचे व सोयीचे ठिकाण माथेरान असल्याने माथेरान येथील त्यांच्या नातेवाईकांच्या घरी सोय करण्यात आली होती. बीडखुर्द व जांबरुंग येथील दरडप्रवण लोकांची सोय अष्टविनायकमधील महड देवस्थानच्या भक्तनिवासात करण्यात आली होती. टेंबेवाडी येथील लोक हनुमान मंदिर टेंबेवाडी, जंगमवाडी यांचे समाज मंदिर, चांगवाडी यांचे समाज मंदिर व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत, हाशाची पट्टी येथील दोन घरांची सोय कर्जत तालुक्यातील मोहाचीवाडी नेरळ येथे करण्यात आली होती.

> दरडग्रस्त गावांचा अभ्यास केला असून तशा सूचनाही गावकरी मंडळींना दिल्या आहेत, त्याचबरोबर सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना अतिवृष्टीच्या काळात सतर्क राहण्याचे आव्हान केले आहे. तर अतिवृष्टीच्या काळात नागरिकांनीही सतर्क रहात कोणतीही गरज भासल्यास तात्काळ प्रशासनाला कळवावे. अतिवृष्टीच्या काळात नागरिकांनी कोणत्याही घटनेकडे दुर्लक्ष करू नये तर त्या घटनेची माहिती प्रशासनाला कळवत आपणही सतर्क रहावे.
>
> – आयुब तांबोळी, तहसीलदार खालापूर

# पडसरे येथे प्रवेशोत्सव साजरा



**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

कुलाबा जिल्हा आदिवासी सेवा मंडळ पाली संचलित आदिवासी आश्रमशाळा पडसरे येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्रवेशोत्सव १५ जून रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ग्रुप ग्रामपंचायत महागांवच्या सरपंच दिपिका सुतार यांच्या शुभहस्ते प्रवेशोत्सव करण्यात आला.

नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लेझीम-बेंजो पथकने स्वागत करण्यात आले.विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ, चॉकलेट देण्यात आले.पहिल्याच दिवशी शैक्षणिक खेळ, बौद्धिक खेळ,शारीरिक खेळ इत्यादी मनोरंजक खेळ खेळून मुलांमध्ये आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण करण्यात आले. विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते पाठयपुस्तके आणि स्कूल बॅग देण्यात आल्या. या प्रसंगी पेण प्रकल्प कार्यालयातील देवडे, विजय सुतार, पालकवर्ग उपस्थित होते. प्रवेशोत्सवाचे नियोजन मुख्याध्यापक संदिप शिंदे, मुख्याध्यापिका मीनाक्षी ढोपे, शिक्षक वर्ग, अधीक्षक, कर्मचारी वर्ग यांनी केले.

# जिल्हा रुग्णालयातील नेत्र शस्त्रक्रिया कक्ष बंद

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

डोळ्यांवर मोफत शस्त्रक्रिया व्हावी म्हणून जिल्हाभरातून रुग्ण अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात येतात, महिनाभरापासून शस्त्रक्रिया कक्ष बंद आहे. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे. शिवाय ज्या रुग्णांचे ऑपरेशन झाले आहे, त्यांना पुनर्तपासणीत अडचणी येत आहेत. पावसाळ्यात डोळ्यांचे आजार बळावतात. त्यामुळे शस्त्रक्रिया कक्ष लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी होत आहे. तर पुढील दोन दिवस हा कक्ष बंद राहणार असल्याची माहिती जिल्हा रुग्णालय प्रशासनाकडून देण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयाच्या आवारात नेत्र शस्त्रक्रिया विभागासाठी वेगळी इमारत आहे.

मात्र, या इमारतीच्या छताचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याने पावसाळ्यात गळती लागते. भिंतींना लागलेली बुरशी, छतातून गळणारे पाणी यावर उपाय म्हणून गतवर्षी इमारतीच्या छताची दुरुस्ती करून ऑपरेशन थिएटरचे काम करण्यात आले होते. आरसीसी छतावर लोखंडी पत्र्याची शेड टाकण्यात आले आहे. दुरुस्तीचे काम पूर्ण केल्यावर शस्त्रक्रिया विभाग पूर्ण क्षमतेने काम करेल, असा विश्वास रुग्णालय प्रशासनाकडून व्यक्त केला गेला होता. परंतु दोन महिन्यापूर्वी ऑपरेशन थिएटरमधील वातानुकूलित यंत्रणा निकामी झाली होती. त्यामुळे शस्त्रक्रिया विभाग बंद आहे. सध्या नेत्र शस्त्रक्रिया विभागात एकही रुग्ण दाखल नाही. सर्वसामान्य रुग्णांना उपचार करता यावेत, म्हणून शस्त्रक्रिया विभाग सुरू करण्यात आला. यासाठी सरकारने कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले, मात्र देखभाल-दुरुस्तीअभावी नेत्र शस्त्रक्रिया विभाग सातत्याने बंद पडत असून सर्वसामान्य रुग्णांना आर्थिक भूर्दंड सहन करावा लागतो.

> ऑपरेशन थिएटरमधील वातानुकूलित यंत्रणेच्या दुरुस्तीसाठी मेकॅनिक बोलावला होता, मात्र दुरुस्तीनंतरही तांत्रिक बिघाड झाल्याने हा विभाग बंद आहे. पावसाळ्यात संसर्गाचा धोका निर्माण होत असतो. सध्या नेत्र विभाग बंद असला तरी लवकरच सुरू करण्याचा प्रयत्न आहे.
>
> – अंबादास देवमाने, जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड.

## ■ रुग्णांची गैरसोय; खासगी उपचारापोटी आर्थिक भुर्दंड

# अनाथ मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप

**। उरण । वार्ताहर ।**

समाजातील अनाथ, गोर-गरिब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत मिळावी हे उद्दिष्ट डोळ्यासमोर समीर शंकर म्हात्रे, कळंबुसरे यांनी स्थापन केलेल्या सायरा समीर म्हात्रे शैक्षणिक सामाजिक संस्था, कळंबुसरे या संस्थेमार्फत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. त्यातील राबविण्यात आलेले एक स्तुत्य उपक्रम म्हणजे अनाथ मुलांना मोफत वह्या पुस्तके वाटप अभियान. या उपक्रमाअंतर्गत कौस्तुभ पाटील, वेदांती पवार, उन्मेक्षा ठाकूर, नितिक ठाकूर, भाविका पाटील, भावेश पाटील, भूमिका चव्हाण , श्रेयस चव्हाण, आस्था जैन, पलक जैन, निदिता करवडकर, हरदिप करवडकर, मनिषा सुरेश कोरेकर अशा १ ली ते पदवी पर्यंतच्या अनेक मुलांना मोफत वह्या-पुस्तके वाटप करण्यात आली.या स्तुत्य अशा उपक्रमासाठी संस्थेचे सल्लागार विठ्ठल ममताबादे, कार्याध्यक्ष पद्माकर पाटील, सदस्या ॲड. रेश्मा धुळे, संस्थापक अध्यक्ष समीर म्हात्रे यांनी मोलाचे सहकार्य केले.



# सुकेळी खिंड दरडीच्या सावटाखाली

## वाहनचालक, प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण

**। सुकेळी । वार्ताहर ।**

मुंबई -गोवा महामार्गाचे काम हे अद्यापपर्यंत पाहिजे तसे पूर्ण झालेले नसून बरेच काम बाकी आहे. यातच पावसाळा सुरू झाल्यामुळे महामार्गाचे काम अत्यंत संथगतीने सुरू आहे. अशातच याच मार्गावरील अपघातासाठी धोकादायक खिंड म्हणून ओळख असलेल्या सुकेळी खिंडीची अवस्था एकदम भयानक झाल्याचे चित्र सद्यपरिस्थितीत पाहावयास मिळत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही सुकेळी खिंड ही पावसाळ्यात वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणात अडचणीची ठरणार आहे. आताच्या परिस्थितीत सुकेळी खिंड ही दरडीच्या सावटाखाली असून संबंधित कंपनीने सुकेळी खिंडीत वेळीच उपाययोजना करणे गरजेचे आहे.

महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामासाठी खिंडीमधिल जे डोंगर खोदले गेले आहेत त्यामुळे पावसाळयाच्या सुरूवातीलाच सुकेळी खिंडीमध्ये या डोंगरावरुन मोठं मोठे दगडगोटे व माती मोठ्या प्रमाणात खाली आले आहेत.



त्यातच ऐन पावसाच्या दिवसांमध्ये खिंडीमधील रस्त्याचे काम सुरू असल्यामुळे वाहतुकीसाठी अडथळा ठरत आहे. या ठिकाणी पावसाळ्यात चिखलाचे साम्राज्य पसरण्याची शक्यता आहे. सुरवातीच्या पहिल्याच पावसातच तासभर पाऊस पडल्यानंतर दरड कोसळण्यास सुरुवात झाली असेल तर पुढील काळात पडणाऱ्या जोरदार पावसात नेमके काय घडेल हे सांगता येत नाही त्यामुळे वाहनचालक व प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# फडके विद्यालयात प्रवेशोत्सव




**पनवेल :** तालुक्यातील शिरढोण येथील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके माध्यमिक विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. शासनाच्या मोफत शैक्षणिक पुस्तक वाटप योजनेंतर्गत पाचवी ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक सुर्यवंशी यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच येथील शिक्षक गुंजाळ यांच्या आईंच्या स्मरणार्थ विद्यार्थ्यांना वही व इतर शैक्षणिक साहित्य देण्यात आले.

नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांना बिस्कीट व केळी वाटप करण्यात आली. यंदा दहावीचा ९२.८६ टक्के निकाल लागल्यामुळे संस्थेच्या वतीने शाळा समिती प्रमुख, सदस्य, पालक व माजी विद्यार्थ्यांकडून मुख्याध्यापक, शिक्षकांचे अभिनंदन करण्यात आले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय २५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- अलिबाग येथे हॉस्पिटलमध्ये कामासाठी पुरूष कर्मचारी पाहिजेत. योग्य पगार दिला जाईल. डॉ.सरोज तांबोळी मेमोरिअल हॉस्पिटल-रामनाथ. डॉ. अतुल कोतेकर- ७७९८८८०७०४, प्रिया कर्णिक-९३७२२०४९७०
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १. वेटर, २. नाश्ता बनवणारा कूक, ३. हाऊस कीपिंग, २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा. (व्हॉटसॲप वर मेसेज करावा.) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५
- हार्डवेअर दुकानात मांडवा येथे मुलगी कामाला पाहिजे. मो. ८००७८९३२३२, ९४२१९५४३४८
- ५०००० रुपये किंमतीचा CNC मशिन ऑपरेटींगचा कोर्स मोफत, मोफत, मोफत, पात्रता १२ वी किंवा १५ वी पास, वयोमर्यादा-३० वर्षे पर्यंत. पगार- १०००० रुपये, ८ तास ड्युटी, संपर्क- ९०४९६५५५२३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# रूपेश आवास्कर यांची निवड

**। पाली । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील तरुण तडफदार छायाचित्रकार रूपेश आवास्कर यांची सुधागड पाली फोटोग्राफर असोसिएशनच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

रविवारी (दि.१६) पाली येथे सुधागड पाली फोटोग्राफर असोसिएशन कार्यकारिणीची बैठक पार पडली या बैठकीत तालुक्याची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी नवीन व होतकरू तरुणांना असोसिएशनच्या प्रमुखपदी संधी देण्यात आली. रूपेश आवास्कर यांची सुधागडमध्ये उत्कृष्ट छायाचित्रकार म्हणून ओळख आहे. फोटोग्राफी क्षेत्रात गरीब असो वा श्रीमंत अतिशय माफक दरात लोकांना वेळेवर पोहचून सेवा देण्याचे काम आवास्कर करतात. त्यांच्या कामाची दखल घेत आवास्कर यांची तालुका अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. याचबरोबर उपाध्यक्षपदी प्रताप मांडावर, सेक्रेटरीपदी सागर देशमुख व खजिनदारपदी नितीन शिर्के यांची निवड करण्यात आली आहे.



या कार्यकारिणी निवडी प्रसंगी ज्येष्ठ फोटोग्राफर योगेश राऊत, सचिन दाभोळकर, निलेश शिर्के, अमित सागळे, नितीन सुतार, दिपक जाधव, सौरभ खराडे यांसह राजेश रुईकर, राजेश जमधरे, साजन यादव, सागर खरिवले, विजय वाडेकर, आदित्य भोरापकर आदी उपस्थित होते.



● पावसाळ्यात वलग्नीचे मासे पकडण्याचे वेध लागले आहेत. वलग्नीची मासळी पकडण्यासाठी महाजने येथील तरुण पाग तयार करताना. (छायाचित्र - प्रमोद जाधव)

## न्याय न दिल्यास उपोषणाचा इशारा

# कंपनीविरोधात सारंग ग्रामस्थ आक्रमक

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील सारंग गावाच्या हद्दीत नव्याने उभारण्यात येणाऱ्या मे.क्लेरीझेस एस.इ.झेड. प्रायव्हेट लिमिटेड कंपनी मालकाने शेतकऱ्यांची जमीन कवडीमोल भावाने खरेदी केली आहे. कंपनीचे बांधकाम करताना स्थानिकांना रोगजार आणि कामधंदा देण्याचे कबूल केले होते. मात्र कंपनी व्यवस्थापनाने स्थानिकांना काम न देता दडपशाही पद्धतीने काम करण्यास सुरु केल्याने स्थानिकांनी आक्रमक पवित्रा घेत खालापूर तहसीलदार व खालापूर पोलीस ठाण्यात बहुउद्देशीय सेवा सहकारी संस्थेच्या माध्यमातून निवेदन देत दिले आहे.स्थानिकांना रोजगार दिला नाही, तर सोमवारी (दि.२४) देविदास सोगे व नारायण जमदाडे हे उपोषणास बसणार असल्याचा इशारा निवेदनातून प्रशासनाला दिला आहे.



खालापूरचे तहसिलदार आयुब तांबोली यांची सारंग शेतकरी ग्रामस्थ बहुउद्देशीय सेवा सहकारी संस्था मर्या.अध्यक्ष शिवाजी पवार, उपाध्यक्ष देविदास सोगे, सचिव राजेंद्र जमदाडे, सल्लागार ज्ञानेश्वर सोगे, खजिनदार संदिप पाटील, महेश सोगे, जगदीश दिसले जयदास मुसळे, मंगेश सोगे, अजय सोगे, मीतेश दिसले, संध्या दिसले, सुमन दिसले, विठाबाई दिसले, जनार्दन दिसले, अलका पांडव, दिपाली पवार, ॲड.मानसी सोगे, विद्या पवार, वृंदा पवार, सोनल पवार, सुधीर दिसले, प्रसाद दिसले आदि प्रमुखांनी भेट घेतली. यावेळी सारंग गावातील शेतकरी यांची जागा मे.क्लेरीझेस एस.इ.झेड.प्रा.लि. या कंपनीने वेगवेगळ्या माध्यमातून कवडी मोलाने जमीन १९९५ - ९६ साली हस्तांतरित केली होती. त्या जमिनी घेत असताना शेतकरी वर्गाला तोंडी आश्वासने देण्यात आली होती. या जमिनीवर सिमेंट पोल बसविण्यापासून ते कंपनी पूर्णपणे उभी रपर्यंत जी काही कामे असतील, ती सर्व कामे शेतकरी व ग्रामस्थांनाच देण्यात येतील, त्यात लागणारे साधनसामग्री पासून ते मटेरियल सप्लायसह शेतकरी व ग्रामस्थांना कामे देण्यात येतील, अशी आश्वासने कंपनी व्यवस्थापनाकडून देण्यात आली.

तर तुमच्या कुटुंबाला कायमची रोजीरोटी राहून सगळ्यांना कामधंदा मिळेल असे सांगण्यात आले होते, परंतु सदर कंपनीने जागा हस्तांतरित केल्यानंतर शेतकऱ्यांना जमिनी लागवडीपासून वंचित केले. यामुळे ग्रामस्थानी सारंग शेतकरी ग्रामस्थ बहुउद्देशीय सेवा सहकारी संस्थेच्या माध्यमातून खालापूरचे तहसिलदार आयुब तांबोळी यांची भेट आपल्या समस्या मांडून न्याय मिळावा अशी मागणी केली आहे.

> कंपनीने मागील चार ते सहा महिन्यापूर्वी सारंग गावातील जमिनीवर काम चालू केले असून, ती कामे बाहेरील व्यक्तीस देण्यात आली. बाहेरील ठेकेदाराने काम चालू केल्याचे ग्रामस्थ व शेतकरी यांना समजताच चालू असलेले कामासंदर्भात त्या ठेकेदाराकडे विचारपूस करण्यास गेलेल्या ग्रामस्थ आणि शेतकरी वर्गाला सदर ठेकेदाराने धक्काबुक्की करत शिवीगाळ केली व गुंडांना गावातील ग्रामस्थांना व शेतकऱ्यांना मारण्याकरीता बोलावले. या बाबतचा सबळ पुरावा उपलब्ध आहे. त्यामुळे ग्रामस्थांवर अन्याय होत असल्याने न्याय मिळावा म्हणून खालापूर तहसिलदार व खालापूर पोलीस यांना निवेदन दिले आहे. यातून तोडगा नाही मिळाला तर २४ जूनपासून उपोषण करणार आहोत.
>
> – राजेंद्र जमदाडे, सचिव,सारंग शेतकरी ग्रामस्थ बहुउद्देशीय सेवा सहकारी संस्था

# जमीन सुपिकता जागृती दिन साजरा

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील चाणजे हद्दीतील दाउर नगर येथील वाघोबादेव मंदिर येथे बुधवार (दि. १९)रोजी जमीन सुपिकता जागृती दिन साजरा करण्यात आला. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त दि. १७ जून ते १ जुलै या कालावधीत कृषी संजीवनी मोहीम पंधरवडा कार्यक्रमांतर्गत जमीन सुपिकता जागृती दिन साजरा करण्यात आला.हा कार्यक्रम उरण तालुका कृषी विभागाकडून घेण्यात आला. उरण तालुका कृषी अधिकारी ऋतुजा नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी नागाव कृषी पर्यवेक्षक ए.डी. बुरकुल यांनी कृषी विभागाच्या योजनांबाबत शेतकरी महिलावर्गाला मार्गदर्शन केले


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे सांडशी ता. कर्जत जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विदयमान मालक तुषार अनिल त्रिवेदी यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे .

**मिळकतीचे वर्णन**

मौजे. सांडशी ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| ३४ | १/ब/१ | ०-४०-२० | ३६८ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर खालील व्यवहारास कोणचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहाणार नाही.

कर्जत
ता. २०/०६/२०२४ — खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
मो.नं. ९९२१७२२२०० — **ॲड. समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं .०२,साई सावली अपार्टमेंट,
कर्जत सिवील कोर्टसमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे खोपे , ता. रोहा जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक पुष्पलता अर्जुन म्हात्रे रा. १२/८८९, आरुधंती निवास हौ. सोसायटी, टाटा पॉवर हाउस मागे ठाणे, बोरीवली पूर्व मुंबई- ४०० ०६६ यांच्या नांवे असलेली खुद्द मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली मिळकत माझे स्नेही यांना कायम स्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन कमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| खोपे ता. रोहा जि. रायगड | २४४ | ०-८१-००<br>पो.ख. ०-३५-००<br>एकूण क्षेत्र १-१६-०० | ०.६६ |

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- १८/०६/२०२४ — सही /-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता : श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालयासमोर गाळा क्र. ३, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

### जाहीर नोटीस

दि. २०/०६/२०२४

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे नसरापुर ता. कर्जत जि. रायगड येथील

| नाव | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|---|
| श्री. शंकर भिका दुर्गे | ५६ | ३ | ०-२७-८० | ३-४४ |
| श्री. ज्ञानेश्वर रघुनाथ भगत वैगरे | ५५ | ३ | ०-५३-०० | १-४४ |
| श्री. सखाराम नथु ठोंबरे | ६६ | १९ | ०-५६-०० | ०-५० |
| | ६७ | ४ | ०-२०-०० | १-४४ |

च्या शेतजमीन मिळकती विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविले आहे. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबध नाही. व असल्यास ते जाणीवपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे अशिल उपरोक्त शेतजमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. ''मातोश्री'' निवास आवळस, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेल्या मिळकती त्या मिळकतींचे विद्यमान मालक १) श्री. शरद गोपाळ कुंटे २) श्री. स्वरुप शरद कुंटे ३) सौ. प्राजक्ता स्वरुप कुंटे सर्व रा. बोरपाडा, पो. बामणगाव ता. अलिबाग, जि. रायगड यांचे कडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**

| अनु.क्र. | मौजे | सर्व्हे/हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| १ | बामणगाव ता. अलिबाग | २७१/२ | ०-२४-०० | ५-२२ |
| २ | बामणगाव ता. अलिबाग | २६९ | ०-२९-०० | ०-५८ |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग, — सही/-
दि. १९-०६-२०२४ — **ॲड. आर. बी. कोसमकर**
चिरायु बिल्डींग, राम मंदिर शेजारी
ब्राम्हणआळी अलिबाग

### जाहीर नोटीस

सर्व नोटीसीने संबंधितांना असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे आवास, ता. अलिबाग येथील खालील वर्णन केलेली मिळकत श्री. राम कृष्ण रघुनाथ घरत यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकती निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| भिसराई, ता. अलिबाग,जि. रायगड | ९९/२ | ०-५७-४३<br>पो.ख. ०-०५-९०<br>एकूण ०-६३-३३ | १३-१७ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बिनजोखमी आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग, — **ॲड. विजय अनंत पेढवी**
दि. १९.६.२०२४ — मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८२२१८६७४०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, मौजे मुद्रे खूर्द, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती प्लॉट मिळकत आमचे पक्षकार, त्या मिळकतीचे मालकांकडून विकसनाकरीता घेणेचे विचारात आहेत.

| मालकांची नावे | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १) चांगदेव रामचंद्र गवळी<br>२) परमेश्वर भगवानराव लांबूटे<br>३) पूनम रमेश संकपाळ<br>४) मयुरा सहदेव भोसले<br>५) अनिल मोहनराव घाडगे<br>६) गोविंद माधवराव मुंडकर | १६ | १/अ/५ | ०-०६-९०<br>(६९० चौ.मी.) | १३-८० |

सबब सदर मिळकतीच्या विकसनाचे व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकती बाबत विकसनाचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकांबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :-२०/०६/२०२४ — **ॲड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट बाजारपेठ कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१.

### जाहीर सुचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद वर्णनाच्या बागायत जमिन मिळकतीपैकी ०-४१-२० (हे.आर) बागायत जमिन मिळकत, श्रीमती बनिता दामोदर तेलगे, श्री. सुनिल दामोदर तेलगे, श्री. अनिल दामोदर तेलगे, श्री. सुधिर दामोदर तेलगे, श्री. अजय दामोदर तेलगे व सौ. मयुरी महेंद्र गायकवाड यांच्या सामाईक मालकी हक्काची असून, सदरील सामाईक जमिन मिळकतीपैकी श्री. सुधिर दामोदर तेलगे व अजय दामोदर तेलगे, दोघेही राहणार आग्राव, चौल, ता. अलिबाग, यांच्या सदरील बागायत जमिन मिळकतीमधिल अविभक्त हिश्श्याची ०-११-५० आर्स बागायत जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरित झाला आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | हि.नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|---|
| चौल, ता. अलिबाग | २०९५ | ० | ०-५१-१०<br>०-०१-२० पो.ख.<br>०-५२-३० एकूण | २७-९२ |

सदरील बागायत जमिन मिळकतीमधील ०-४१-२० (हे. आर) बागायत जमिन मिळकतीपेकी श्री. सुधिर दामोदर तेलगे व अजय दामोदर तेलगे यांच्या अविभक्त हिश्श्याची ० ११-५० (हे. आ.) जमिन मिळकत.

अलिबाग, — सही/
दिनांक : २०/०६/२०२४ — **(ॲड. निवास ना. पाटील)**
श्री क्षेत्र, सहाण,
ता. अलिबाग, जि. रायगड.
खरेदीदाराचे वकील


आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे

## श्री. डी. डी. विसपुते अध्यापक विद्यालय नविन पनवेल ( रायगड )

(मराठी व इंग्रजी माध्यम)

महाराष्ट्र शासन व एन.सी.टी. ई मान्यताप्राप्त विनाअनुदानित अध्यापक विद्यालयामध्ये

**व्यवस्थापन कोटा**
**डी. एल. एड ( डी. एड. ) प्रवेश २०२४ - २५ साठी**

जागांकरीता अर्ज मागवित आहे.

* **शैक्षणिक पात्रता :** इ. १२ वी मागासवर्गीयांसाठी ४४.५०% गुण व खुला गट ४९.५०% गुणांसह उत्तीर्ण MCVC विद्यार्थ्यांना १. कृषी गटातील हार्टीकल्चरल व कॉप सायन्स किंवा २. आरोग्य व वैद्यकिय सेवा गटातील कॅच ॲण्ड प्रिस्कूल मॅनेजमेंट विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
* YCMOU मधून FYBA किंवा पदवी उत्तीर्ण
* शाखानिहाय व माध्यमनिहाय उपलब्ध जागा :

| माध्यम | विज्ञान | कला | वाणिज्य | एकूण |
|---|---|---|---|---|
| मराठी | ०५ | ०४ | ०१ | १० |
| इंग्रजी | ०५ | ०४ | ०१ | १० |

**संवर्गनिहाय उपलब्ध जागा :**

| माध्यम | खुला | एससी + एसटीव्हीजे + एनटीबी + एनटीसी + एनटीडी | एसबीसी + ओबीसी | एकूण |
|---|---|---|---|---|
| मराठी | ५ | ४ | १ | १० |
| इंग्रजी | ५ | ४ | १ | १० |

उपलब्धतेनुसार सामाजिक घटनात्मक व संदर्भनिहाय आरक्षण राहील. अपेक्षित संवर्गातील व शाखेतील अर्ज न आल्यास इतर संवर्ग व शाखातून जागा भरल्या जातील. अर्ज विक्री दि. २१ .६.२०२४ ते २५.६.२०२४ तसेच स्विकृती दि. २१.६.२०२४ ते २५.६.२०२४ या कार्यालयीन वेळेत १०.३० ते ५.३० पर्यंत राहील. प्रवेश अर्जाची किंमत खुला गट २०० रु. व मागास वर्गियांसाठी १००रु. यप्रमाणे असेल. तसेच मराठी माध्यमाची शैक्षणिक शुल्क १५००० रु. व इंग्रजी माध्यमाचे १५००० रु. असेल.

संपर्क
**प्राचार्या**
श्रीम. मधाळे कुसूम परिसा

**श्री. डी.डी. विसपुते अध्यापक विद्यालय प्लॉट नं. ४१, सेक्टर - १५ रेल्वे स्टेशनजवळ, नविन पनवेल, जि. रायगड**
**फोन नं. - ९८२१७०४३५० / ८८२८४८२१६७ / ०२२२७४६२८८६ / ९०८२५२८५६८ / ९९६०९३८०६१**


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक माधुरी पांडुरंग म्हसे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. क्षेत्र | (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ४५ | ६/अ | ०-८६-०० | ०-५० |

तरी बरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुल अखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.२०/०६/२०२४ — खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खांडपे ता. कर्जत जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे आशील विजय विठ्ठल अडबल्ले, व अनुषा नागेशराव रोडरिग्स हे रमेश महादु कुंभार व ईतर ७ या विद्यमान मालकाकडून खरेदी घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं हिस्सा नं | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ५९/२/क | ०-७९-७० गुंठे | ९-६८ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विकी, गहाण, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, वारस हक्क ,पोटगी, लीजचार्ज, ताबा, वहिवाट, अथवा कोणताही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास, सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी पुराव्यासह खाली सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत नोंदवावी .सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत — आशीलातर्फे ॲडव्होकेट
२०/०६/२०२४ — **ॲड प्रफुल्ल विश्वनाथ देशमुख**
मो. नं ९२८४६७७५१६ — मु.पो. कोंदीवडे ता कर्जत
जि. रायगड ४१०२०१

### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे खार पेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली जमिन मिळकतीपैकी ०-२६-३० (हे.आर) शेतजमिन मिळकत श्री. रामकृष्ण जोमा पाटील, राहणार मुंबई, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायम स्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. रामकृष्ण जोमा पाटील, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला माझे अशिलांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तहेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तहेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| खार पेढांबे ता. अलिबाग. | ४१ | ०-४९-७०<br>०-०३-०० पो.ख.<br>०-५२-७० एकूण | ८-३२ |

सदरील शेतजमिन मिळकतीपैकी श्री. रामकृष्ण जोमा पाटील यांच्या हिश्श्याची ०-२६-३० (हे.आर) शेतजमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : १९/०६/२०२४ — सही/
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे तांबस, ता. कर्जत जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक राहुल प्रविणभाई पटेल व सुनील कांतीलाल पटेल यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे .

**मिळकतीचे वर्णन**

मौजे. तांबस, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| ४३ | २ | ०-१५-०० | ०-३९ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर खालील व्यवहारास कोणचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ११ (अकरा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहाणार नाही.

कर्जत
ता. २०/०६/२०२४ — खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
मो.नं. ९९२१७२२२०० — **ॲड. समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं .०२,साई सावली अपार्टमेंट,
कर्जत सिवील कोर्टसमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असून त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे टेमघर, ता. रोहा, जि. रायगड येथील...**

| मालकाचं नांव | गट नं. | एकुण क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै | प्रकार |
|---|---|---|---|---|
| श्री. सुबोध प्रभाकर राणे व श्री. समीर रामचंद्र राणे | ७०/१/२/३/ड | जिरायत ०-५१-५०<br>पो.ख. ०-०६-००<br>एकुण ०-५७-५० | ५.३४ | वर्ग १ |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालू असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि.१८/०६/२०२४ — सही
**ॲड. पी. जी. दाभाडे**
रा. फ्लॅट नं. ४०२, बी. विंग, चौथा मजला,
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ. वागळे हॉस्पिटल जवळ, ता. रोहा,
जि. रायगड पिन नं.४०२१०९
मोबा नं.९२७२७१३९५६

### जाहीर नोटीसीस उत्तर

प्रति,
**ॲड. विधान अरविंद पाटील**
पत्ता : वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
ता. अलिबाग, जि. रायगड.

**विषय : आपल्या दि. २८/०४/२०२४ रोजीचे दैनिक कृषीवल या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या जाहिर नोटीशीस उत्तर.**

महोदय,

तुम्ही तुमचे अशिल राजाराम नारायण पडवळ यांच्या तर्फे दिनांक २८/०४/२०२४ रोजीचे दैनिक कृषीवल या वृत्तपत्रामध्ये मौजे म्हात्रोळी, ता. अलिबाग गट नं. २२६/१, २२६/अ/१/१ व २२६/अ/१ या मिळकतींबाबत जाहिर नोटीस प्रसिद्ध केलेली असून सदर जाहीर नोटीस आमच्या अशिलांच्या वाचनात आली असून आमचे अशिल निरज मोहन पटेल रा. घाटकोपर मुंबई यांनी दिलेल्या माहितीवरुन व पुरविलेल्या कागदपत्रांच्या आधारे वर उल्लेखित आपले जाहीर नोटिशीस उत्तर देण्यात येते ते खालीलप्रमाणे.

१) तुमची दिनांक दिनांक २८/०४/२०२४ रोजीचे जाहिर नोटीस खोटी व खोडसाळ असून ती आमच्या अशिलांना मान्य व कबुल नाही. सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करताना सदरच्या मिळकतींच्या कागदपत्रांची पडताळणी न करता सदरची जाहिर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. सदर जाहीर नोटीसीस आमच्या अशिलांची सक्त हरकत आहे.

२) मौजे म्हात्रोळी, गट नं. २२६/अ या मिळकतीचे एकत्रिकरणापुर्वीचे स. नं. ४३/४ ४५/५अ, ४५/५क, ४५/६, ४५/७, ४६ /१२ व ४७/४ असे होते. सदरहु मिळकतींच्या एकत्रिकरणातून गट नं. २२६/अ हा तयार झालेला आहे. आमच्या अशिलांनी मौजे म्हात्रोळी, गट नं. २२६/अ या मिळकतीपैकी मौजे म्हात्रोळी, स.नं. ४६/१२ जुना मौजे सारळ, स.नं. १३५/१२ क्षेत्र ०-७२-०० हे. आर. ही मिळकत मिळकतीचे मालक सुधाकर मोरेश्वर नाईक, बाळाराम मोरेश्वर नाईक तर्फे अखत्यारी रजनी बाळाराम नाईक व सिताराम मोरेश्वर नाईक यांचेकडुन दिनांक १७/०९/२०२१ रोजीचे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी केलेली असुन सदरहु मौजे सारळ, स. नं. १३५/१२ मौजे म्हात्रोळी, स. नं. ४६/१२ ही मिळकत आमचे अशिलांचे वडील मोरेश्वर काशिनाथ नाईक यांनी नारायण नथु नाईक यांच्याकडून दिनांक १७/०३/१९३३ रोजीचे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी केलेली असुन मोरेश्वर नथु नाईक यांचे नाव मिळकतीच्या ७/१२ सदरी मौजे सारळ फेरफार नं. ४५४ नुसार दाखल झालेले आहे. सदर मिळकतीशी तुमचे अशिलांचे पूर्वगामी वत्सला नारायणपडवळ तसेच तुमच्या अशिलांचा कोणताही हक्क हितसंबंध नसुन सदरची मिळकत आमचे अशिलांचे पुर्वगामी मोरेश्वर नाईक यांचे स्वकष्टार्जीत मालकीची होती.

३) मौजे सारळ फेरफार नं. १८६८ मध्ये स.नं. १३५/१२ नमुद असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे सदर मिळकतीला तुमचे अशिलांच्या पुर्वगामी वत्सला नारायण पडवळ यांचा तसेच तुमच्या अशिलांचा कोणताही हक्क हितसंबंध दिसुन येत नाही. आमच्या अशिलांनी खरेदीखताने गट नं. २२६/ १ पैकी क्षेत्र ०-७२-०० हे.आर. जुना मौजे सारळ, स. नं. १३५/१२ नविन म्हात्रोळी स.नं. ४६/१२ ही मिळकत खरेदी केलेली आहे. सदर मिळकतीशी तुमच्या अशिलांचा कोणताही हक्क हितसंबंध नसुन सदरची मिळकत सुधाकर मोरेश्वर नाईक यांचे वडील मोरेश्वर नथु नाईक यांनी नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी केलेली असल्याने सदर मिळकतीशी वत्सला नारायण पडवळ यांचा कोणताही हक्क हितसंबंध पोहचत नाही.

तरी या उत्तराने तुम्हास कळविण्यात येते की, मौजे म्हात्रोळी गट नं. २२६/अ/१/१ व गट नं. २२६/अ/१ या मिळकती संदर्भात तुम्ही प्रसिद्ध केलेली जाहिर नोटीस मागे घेण्यात यावी.

अलिबाग, — **ॲड. संजय द. म्हात्रे**
तारीख : १९/०६/२०२४ — पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

निवडक

## फिफामध्ये धोनीची क्रेझ

**नवी दिल्ली :** एमएस धोनीची लोकप्रियता केवळ क्रिकेट विश्वातच नाही तर जगभरात आहे. धोनीच्या फॅन फॉलोइंगचा अंदाज यावरून लावला जाऊ शकतो की फिफाने क्रिस्टियानो रोनाल्डोचा फोटो 'थाला फॉर ए रीजन' या कॅप्शनसह शेअर केला आहे. २०२४ या संपूर्ण हंगामात एमएस धोनीसाठी सोशल मीडियावर 'थाला फॉर ए रिजन' ट्रेंड करत राहिला. जिथे जिथे ७ नंबर दिसला तिथे चाहत्यांनी असा उल्लेख करायला सुरुवात केली. पण आता हा ट्रेंड फक्त क्रिकेटमध्येच नाही तर आता फुटबॉलमध्येही फॉलो केला आहे.

## स्टॉयनिसची मोठी झेप

**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलियाचा स्टार अष्टपैलू खेळाडू मार्कस स्टॉयनिसने आयसीसी टी-२० क्रमवारीत मोठी झेप घेतली. टी-२० अष्टपैलू क्रमवारीत त्याने अफगाणिस्तानच्या मोहम्मद नबीला खाली खेचत अव्वल स्थान पटकावले. दुसऱ्या स्थानावर श्रीलंकेचा कर्णधार वानिंदू हसरंगा तर तिसऱ्या स्थानावर बांगलादेशचा शाकीब अल हसन आला आहे. मार्कस स्टॉयनिसने नामिबियाविरूद्धच्या सामन्यात ९ धावात दोन बळी घेतले होते.

## भारताला अंपायर्सची धडकी

**फ्लोरिडा :** आयसीसीने नुकतेच सुपर-८ मधील सामन्यासाठी अंपायर्सची घोषणा केली. हा सामना २४ जून रोजी होणार असून या साम न्यासाठी रिचर्ड केटलबॉरग आणि रिचर्ड इलिंगवर्थ हे अंपायर्स असणार आहते. जागतिक क्रिकेटमध्ये हे दोन्ही अंपायर्स हे चांगल्या दर्जाचे अंपायर म्हणून ओळखले जातात. मात्र, या दोघांपैकी केटलबॉरग हे नाव भारतासाठी धडकी भरवणारं ठरतं. कारण रिचर्ड कॅटलबॉरग, आयसीसी नॉक आऊट आणि भारतीय संघाची भट्टी कधी जमलीच नाही.

## फ्रान्सला मोठा धक्का

**फ्रान्स :** युरो कपमध्ये एक मोठी घडामोड घडली आहे. फ्रान्सचा स्टार स्ट्रायकर किलियन एम्बाप्पेच्या नाकाला मोठी दुखापत झाली आहे. त्यामुळे तो साखळी गटातील उर्वरित सर्व सामन्यांना मुकणार आहे. एम्बाप्पेला फ्रान्सच्या साखळी सामन्यातील पहिल्याच सामन्यात दुखापत झाली. गट 'ड' मधील ऑस्ट्रियाविरूद्धच्या सामन्यात दुसऱ्या हाफमध्ये त्याच्या नाकाला दुखापत झाली होती. हा सामना फ्रान्सने १-० असा जिंकला होता.

## प्रशिक्षक पदासाठी स्पर्धा

**नवी दिल्ली :** भारतीय वरिष्ठ पुरूष क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षक पदासाठी बीसीसीआयने मुलाखती घेतल्या. मुख्य प्रशिक्षक पदासाठी फक्त गंभीरनेच अर्ज केलेला नाही तर वी.व्ही.रमन यांनी देखील अर्ज केला आहे. बीसीसीआय अधिकाऱ्याने सांगितले की, गौतम गंभीर व्हर्च्युअली मुलाखतीला हजर राहिला होता. मात्र, रमन यांचे प्रेझेंटेशन खूप प्रभावी होते. सध्या गंभीरचे पारडे जड आहे. त्याच्याकडे चांगला अनुभव आहे. मात्र रमनचे प्रेझेंटेशन दुर्लक्ष करण्यासारखे नाही.

# गोल्ड बॉयची 'सुवर्ण' कामगिरी



## 85 मीटरचा सर्वोत्तम भालाफेक

**नीरजचे सहा प्रयत्न**
- पहिला प्रयत्न: ८३.६२ मीटर
- दुसरा प्रयत्न: ८३.४५ मीटर
- तिसरा प्रयत्न: ८५.९७ मीटर
- चौथा प्रयत्न: ८२.२१ मीटर
- पाचवा प्रयत्न: फाऊल
- सहावा प्रयत्न: ८२.९७ मीटर

**। फिनलंड । वृत्तसंस्था ।**

येत्या जुलैमध्ये होणाऱ्या पॅरिस ऑलिम्पिकपूर्वी भारताचा ङ्गगोल्डन बॉयफ नीरज चोप्राने जबरदस्त फॉर्म दाखवला आहे. या स्टार भालाफेकपटूने पावो नुर्मी गेम्समध्ये सुवर्णपदक जिंकलं.

फिनलंडमधील तुर्कू येथे झालेल्या या सामन्यात नीरजने तिसऱ्या प्रयत्नात ८५.९७ मीटर भाला फेकून सुवर्णपदक जिंकले. यासह त्याने ऑलिम्पिकपूर्वी आपण फॉर्ममध्ये आल्याचे संकेत दिले आहेत. या स्पर्धेत फिनलंडचा टोनी केरानेन दुसऱ्या क्रमांकावर राहिला. त्याने ८४.१९ मीटर भालाफेक करून रौप्यपदक जिंकले. फिनलंडच्या ऑलिव्हर हेनलँडरने ८३.९६ मीटर भालाफेक करून कांस्यपदक जिंकले.

नीरज चोप्राने सुरुवातीला चांगली सुरुवात केल्यानंतर मागे पडला होता. त्याने पहिल्या प्रयत्नात ८३.६२ मीटर भालाफेक केला. यानंतर दुसऱ्या प्रयत्नात तो केवळ ८३.४५ मीटरच भालाफेक करू शकला. इथपर्यंत तो ऑलिव्हर हेनलँडरपेक्षा मागे होता. ऑलिव्हरने दुसऱ्या प्रयत्नात ८३.९६ मीटर भालाफेक केला होता. त्यानंतर तिसऱ्या प्रयत्नात नीरज त्याच्या पुढे गेला, जो त्याचा सर्वोत्तम भालाफेक ठरला. ८ खेळाडूंपैकी नीरज एकमेक खेळाडू होता, ज्याने ८५ मीटरचा टप्पा पार केला.

तिसऱ्या भालाफेक नंतर नीरजचे उरलेले भालाफेक खूपच कमकुवत होते. चौथ्या प्रयत्नात तो केवळ ८२.२१ मीटर भालाफेक करू शकला. नीरजचा पाचवा प्रयत्न फाऊल झाला. त्यानंतर सहाव्या आणि शेवटच्या प्रयत्नात त्याने ८२.९७ मीटर भालाफेक केला.

### सर्व भालाफेकपटूंचे सर्वोत्तम थ्रो

- नीरज चोप्रा (भारत) ८८.३६ मीटर
- टोनी केरानेन (फिनलंड) ८४.१९ मीटर
- ऑलिव्हर हेलँडर (फिनलंड) ८३.९६ मीटर
- अँडरसन पीटर्स (ग्रेनाडा) ८२.५८ मीटर
- एंड्रियन माडरि (मोल्दोव्हा) ८२.१९ मीटर
- केशोर्न वॉलकॉट (त्रिनिदाद) ८१.९३ मीटर
- मॅक्स डेहनिंग (जर्मनी) ७९.८४ मीटर

# लोकी फर्ग्युसनचा महाविक्रम

**। फ्लोरिडा । वृत्तसंस्था ।**

न्यूझीलंडचा स्टार वेगवान गोलंदाज लोकी फर्ग्युसनने पापुआ न्यू जिनिया संघाविरूद्ध इतिहासच रचला. टी-२० विश्वचषकाच्या साखळी सामन्यातच गाशा गुंडाळावा लागलेल्या किवींनी शेवट गोड केला. त्यांनी पीएनजीला ७८ धावात गुंडाळले. यात मोलाचा वाटा उचलला तो लोकी फर्ग्युसनने. त्याने ४ षटकात एकही धाव न देता ३ बळी घेतले. टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात किफायतशीर गोलंदाजी करण्याचा विक्रम आपल्या नावावर केला. यापूर्वी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये कॅनडाच्या साद बिन जफरने ४ षटकात शुन्य धावा देत २ बळी घेतले होते.

दरम्यान, पावसाचा फटका बसलेल्या सामन्यात न्यूझीलंडने नवख्या पीएनजी संघाच्या फलंदाजांना चांगलंच दमवले. तरी या नवख्या संघाने २०व्या षटकापर्यंत तग धरला होता. मात्र, १९.४ षटकात न्यूझीलंडने पापुआ न्यू गिनियाचा डाव ७८ धावात संपवला. लोकी फर्ग्युसनने ४ षटकात शुन्य धावा देत सर्वाधिक ३ बळी घेतले. तर, आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेला ट्रेंट बोल्टने आपल्या शेवटच्या सामन्यात १४ धावा देत २ बळी घेतले. टीम साऊदी आणि इश सोधी यांनी देखील प्रत्येकी २ बळी घेत चांगली कामगिरी केली.



# श्रेयस अय्यरचे पुनरागमन

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

गौतम गंभीर भारतीय संघाचा नविन मुख्य प्रशिक्षक बनण्यापूर्वी आयपीएल चॅम्पियन कर्णधार श्रेयस अय्यरच्या आंतरराष्ट्रीय करिअरला नवसंजीवनी मिळू शकते. तो श्रीलंकेविरुद्धच्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी भारतीय संघात पुनरागमन करू शकतो. याशिवाय ५ जुलै पासून झिम्बाब्वेविरुद्ध होणाऱ्या ५ सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा पुढील आठवड्यात होणार आहे. आयपीएलमध्ये चांगली कामगिरी करणाऱ्या अनेक युवा खेळाडूंना या मालिकेत संधी मिळू शकते.

# स्लोव्हाकियाची सनसनाटी सुरुवात



**। फ्रँकफर्ट । वृत्तसंस्था ।**

१८ युरो करंडक फुटबॉल स्पर्धेत स्लोव्हाकियाने 'ई' गटात सनसनाटी सुरुवात केली. बलाढ्य बेल्जियमला त्यांनी १-० फरकाने हरविले. फिफाच्या जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावरील बेल्जियमसाठी पराभव धक्कादायक आहे, कारण तुलनेत स्लोव्हाकिया ४८व्या क्रमांकावर आहे. त्यांच्यासाठी सातव्या मिनिटालस इव्हान श्रॅन्झ याने नोंदविलेला गोल महत्त्वपूर्ण ठरला. बेल्जियमच्या रोमेलू लुकाकू याने उत्तरार्धात केलेले गोल दोन वेळा व्हिडीओ असिस्टंट रेफरी (व्हीएआर) द्वारा अवैध ठरले. शिवाय तासाभराच्या खेळानंतर बदली खेळाडू योहान बाकायोको याला फटका स्लोव्हाकियाच्या डेव्हिड हान्को याने गोलरेषेवरून परतावून लावल्यामुळे बेल्जियमची संधी हुकली.

स्लोव्हाकिया विरुद्धच्या पराभवाने बेल्जियमची १५ सामन्यानंतर अपराजित मालिका खंडित झाली. तिसऱ्यांदा युरो करंडकात खेळणाऱ्या फ्रान्सेस्को काल्झोना यांच्या मार्गदर्शनाखालील स्लोव्हाकियाची सुरुवात शानदार ठरली. 'ई' गटात स्लोव्हाकिया पुढील लढतीत युक्रेन विरुद्ध २१ जून रोजी खेळेल, तर बेल्जियमचा सामना २३ जून रोजी रुमानियाविरुद्ध होईल. या गटात आता रुमानिया व स्लोव्हाकिया यांचे प्रत्येकी तीन गुण आहेत.

# टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई स्पोर्टस् व सामाजिक विकास मंडळ तसेच रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन याच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले आहे. या टेबल टेनिस स्पर्धा दि.२९ व ३० जुन या कालावधीत पनवेल येथील सिडको समाज मंदिर येथे होणार आहेत. या स्पर्धा 'लीग कम नॉक आऊट' पद्धतीने घेण्यात येणार आहेत. या स्पर्धेत प्रत्येकी चार खेळाडूंचे गट असणार असून पहिल्या सामन्यात एखादा खेळाडू हरला तरी त्या खेळाडूला अजुन दोन वेळा खेळण्यासची संधी मिळणार आहे. यामुळे त्या खेळाडूचे स्पर्धेतील आवाहन कायम राहणार आहे.

# बांगलादेशच्या तंझीमला धक्काबुक्की भोवली

**। फ्लोरिडा । वृत्तसंस्था ।**

बांगलादेशचा वेगवान गोलंदाज तंझीम हसन शकीब याला आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने कठोर शिक्षा ठोठावली आहे. टी-२० विश्वचषक दरम्यान आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी शकिबला त्याच्या मॅच फीच्या १५ टक्के दंड ठोठावण्यात आला.

रविवारी (दि.१६) नेपाळ विरुद्ध बांगलादेश सामन्यात डावाच्या तिसऱ्या षटकात तंझीम हसन आणि नेपाळचा कर्णधार रोहित पौडेल यांच्यात धक्काबुक्की झाली होती. दोघांमध्ये बाचाबाची झाली होती. व्हिडिओ पाहिल्यानंतर स्पष्ट होते की, दोघेही एकमेकांशी भांडणार होते. मात्र, इतर खेळाडूंनी मध्यस्थी केल्याने परिस्थिती निवळली.



तंझीम हसन शकीबने आयसीसी आचारसंहितेच्या अनुच्छेद २.१२ चे उल्लंघन केल्याचे आढळून आले आहे. त्याचा गुन्हा खेळाडू, सहाय्यक कर्मचारी, पंच, सामनाधिकारी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीशी अयोग्य शारीरिक संपर्काशी संबंधित आहे. मैदानावरील पंच अहसान रझा आणि सॅम नोगाज्स्की, तिसरे पंच जयरामन मदनगोपाल आणि चौथे पंच कुमार धर्मसेना यांनी त्याच्यावर हे आरोप केले आहेत. तंझीमने आपला गुन्हा कबूल केला असून त्याने आयसीसी एलिट पॅनेलचे सामनाधिकारी रिची रिचर्डसन यांनी दिलेली शिक्षा स्वीकारली आहे.

# चेस फॉर फ्रीडम परिषदेचे आयोजन



**। पुणे । प्रतिनिधी ।**

भारतातील अग्रगण्य ऊर्जा उत्पादक कंपनी इंडीयन ऑईल यांनी प्रायोजित केलेल्या व आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ संघटना(फिडे) यांनी आयोजित केलेल्या दुसऱ्या चेस फॉर फ्रीडम परिषदेचे आयोजन येत्या १९ ते २१ जुन दरम्यान पुणे येथे करण्यात आले आहे.

फिडेच्यावतीने अखिल भारतीय बुद्धिबळ संघटना आणि महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना यांनी या परिषदेचे आयोजन केले असून विविध ठिकाणी तुरुंगात असलेल्या जगभरातील बंदीवानांच्या पुनर्वसनासाठी बुद्धिबळ या खेळाचा कशा प्रकारे उपयोग करता येईल, यासंबंधी जगातील विविध देशांमधून आलेले तज्ञ चर्चा करणार आहेत. शासन मान्यतेने या परिषदेचा पहिला टप्पा म्हणुन फिडे प्राधिकृत परदेशी प्रतिनिधींचे शिष्टमंडळ येरवडा मध्यवर्ती कारागृहास दि.१९ जुन रोजी सकाळी १० वाजता भेट देऊन स्पर्धेत भाग घेतलेल्या बंद्यांशी संवाद साधणार आहेत. तसेच, महिला व पुरुष बंद्यांसोबत प्रातिनिधिक स्वरुपात त्यांचेसोबत बुध्दीबळ खेळणार आहेत व तद्नंतर हॉटेल अँड हयात येथे या परिषदेचा पुढचा टप्पा आयोजित करण्यात आला आहे.

# यू मुम्बाने केले ठक्करला रिटेन

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

यू मुम्बाने प्रतिभावंत खेळाडू मानव ठक्करला आगामी अल्टिमेट टेबल टेनिस हंगामासाठी कायम (रिटेन) ठेवले आहे. मानवसह आंतरराष्ट्रीय महिला खेळाडू मनिका बत्रा या पाच खेळाडूंना त्यांच्या संबंधित फ्रँचायझींनी रिटेन केले आहे. यंदाची स्पर्धा २२ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर दरम्यान चेन्नईच्या जवाहरलाल नेहरू इनडोअर स्टेडियममध्ये खेळली जाणार आहे. तसेच, गेल्या मोसमातील उपविजेत्या चेन्नई लायन्सने दिग्गज खेळाडू शरथ कमल याचा करार कायम ठेवला आहे.

# केन विल्यमसनने सोडले कर्णधारपद

**। फ्लोरिडा । वृत्तसंस्था ।**

न्यूझीलंडच्या क्रिकेट संघाने सोमवारी रात्री पापुआ न्यू गिनी संघावर मात करीत टी-२० विश्वकरंडकाचा आपला शेवट गोड केला. मात्र, त्यांचे या स्पर्धेतील आव्हान साखळी फेरीतच संपुष्टात आले. न्यूझीलंडच्या सुमार कामगिरीचे पडसाद कर्णधार केन विल्यमसन याच्यावरही उमटले आहेत. आता संघाची खराब कामगिरी लक्षात घेऊन कर्णधार विल्यमसननेही एक मोठा निर्णय घेतला आहे, ज्यामध्ये त्याने न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाच्या खेळाडूंचा सेंट्रल कॉन्ट्रॅक्ट सोडण्याचा निर्णय घेतला आहे आणि कर्णधारपदही सोडले.



टी-२० प्रकाराचा पुढील विश्वकरंडक २०२६ मध्ये होणार आहे. न्यूझीलंडचा डावखुरा वेगवान गोलंदाज ट्रेंट बोल्ट यानेही हा आपला अखेरचा टी-२० विश्वकरंडक असेल अशी घोषणा केली. आता केन विल्यमसनही बोल्टच्याच पावलावर पाऊल ठेवले आहे. न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने जारी केलेल्या निवेदनात सांगितले की, खेळाडूंचा सेंट्रल कॉन्ट्रॅक्ट सोडण्यासोबतच केन विल्यमसनने मर्यादित षटकांच्या फॉरमॅटमधील संघाचे कर्णधारपदही सोडले आहे. आपल्या निर्णयाबाबत केन विल्यमसन म्हणाला की, न्यूझीलंडसाठी मी सर्व फॉरमॅटमध्ये खेळलो यांचा मला आनंद आहे आणि मी भविष्यातही योगदान देत राहीन. पण आता मी केंद्रीय करार स्वीकारण्यास असमर्थ आहे. न्यूझीलंडसाठी खेळणे अजूनही माझ्यासाठी महत्त्वाचे आहे. मात्र, क्रिकेटबाहेरील माझे जीवन खूप बदलले आहे. ज्यात मला आता माझ्या कुटुंबासोबत अधिक वेळ घालवायचा आहे.

# जॉन्टी रोड्स भारताचे नवे प्रशिक्षक?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाच्या नव्या मुख्य प्रशिक्षकाची घोषणा लवकरच होणार आहे. बीसीसीआयने याबाबतची प्रक्रिया जवळपास पूर्ण केली असून, गौतम गंभीर हा या पदासाठी प्रबळ दावेदार आहे. आता समोर आलेल्या एका रिपोर्टनुसार, दक्षिण आफ्रिकेचे माजी खेळाडू जॉन्टी रोड्स यांना भारताचे क्षेत्ररक्षण प्रशिक्षक बनवले जाऊ शकते. याबाबत गौतम गंभीरने सहाय्यक कर्मचाऱ्यांमध्ये सामील होण्याबाबत जॉन्टी रोड्स यांच्याशी चर्चा केली आहे. गौतम गंभीर मुख्य प्रशिक्षक बनला, तर जॉन्टी रोड्स यांचे क्षेत्ररक्षक प्रशिक्षक म्हणून स्थानही जवळपास निश्चित आहे.

## पीवायसी रावेतकर फुटबॉल लीग स्पर्धा

# कुमार गटात ॲव्हेंजर्स संघाला विजेतेपद

# खुल्या गटात टस्कर्स संघाला विजेतेपद

**। पुणे । प्रतिनिधी ।**

पीवायसी हिंदु जिमखानातर्फे आयोजित तिसऱ्या पीवायसी रावेतकर फुटबॉल लीग स्पर्धेत कुमार गटात अंतिम फेरीत ऍव्हेंजर्स संघाने गार्डीयन्सचा टायब्रेकरमध्ये ५-४ असा पराभव करून विजेतेपद संपादन केले. तर, खुल्या गटात अंतिम फेरीत टस्कर्स संघाने ग्लॅडिएटर्स संघाचा टायब्रेकरमध्ये २-१ असा पराभव करून विजेतेपद संपादन केले.

पीवायसी हिंदू जिमखाना क्लब येथील मैदानावर पार पडलेल्या कुमर गटातील स्पर्धेत चुरशीच्या अंतिम लढतीत दोन्ही संघानी सुरुवातीपासूनच तोडीस तोड खेळ केला. ७व्या मिनिटाला विहान राठोडने गोल करून ऍव्हेंजर्स संघाचे खाते उघडले. पूर्वार्धात हि आघाडी कायम राखली होती. उत्तरार्धात, अठराव्या मिनिटाला अनय इंगळहळीकरने मिळालेल्या संधीचे सोने करत गोल करून संघाला बरोबरी साधून दिली. अखेरपर्यंत हि बरोबरी कायम राहिली. निर्धारित वेळेत सामना १-१ असा बरोबरीत सुटला. सामना बरोबरीत सुटल्यामुळे टायब्रेकरमध्ये खेळविण्यात आला.






तर, खुल्या गटातील स्पर्धेत चुरशीच्या अंतिम लढतीत दोन्ही संघानी सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ केला. १२व्या मिनिटाला जेहान कोठारीने दिलेल्या पासवर मनन जोशीने गोल करून टस्कर्स संघाचे खाते उघडले. पूर्वार्धात हि आघाडी कायम होती. उत्तरार्धात, मात्र २५व्या मिनिटाला ग्लॅडिएटर्सच्या विक्रम भावेने गोल करून संघाला बरोबरी साधून दिली. त्यानंतर दोन्ही संघाच्या खेळाडूंनी आघाडी मिळवण्यासाठी जोरदार प्रयत्न केले. पण निर्धारित वेळेत सामना १-१ असा बरोबरीत सुटला. सामना बरोबरीत सुटल्यामुळे टायब्रेकरमध्ये सामना खेळविण्यात आला. स्पर्धेतील कुमार गटातील व खुल्या गटातील विजेत्या संघांना आकर्षक चषक देण्यात आले. तसेच, कुमार गटातील बेस्ट डिफेंडर आनंदी बेडेकर व अथर्व इंगळहळीकर, मोस्ट असिस्ट ओजस नाईक, गोल्डन ग्लोव्ह आरुष दिवेकर, गोल्डन बूट विहान राठोड, प्लेयर ऑफ द टूर्नामेंट संवित कासट तर खुल्या गटात बेस्ट डिफेंडर दर्शन कांकरिया, मोस्ट असिस्ट तनिश दादलानी, गोल्डन ग्लोव्ह सिद्धांत पवार, गोल्डन बूट यश भिडे, प्लेयर ऑफ द टूर्नामेंट जेहान कोठारी यांना आकर्षक पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)